सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २ रा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भाजपमध्ये 'नबीन'पर्वाला सुरूवात भाजपचे सर्वात तरूण अध्यक्ष

### मोदी म्हणाले, 'ते माझे बॉस, मी फक्त कार्यकर्ता'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

भाजपला नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळाले. भाजपने १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांची बिनविरोध निवड केली. मंगळवारी भाजप मुख्यालयात याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आली. नितीन नबीन यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. नितीन नबीन यांची निवड होताच ढोल-ताशांच्या गजरात भाजप मुख्यालयाबाहेर उत्सव साजरा करण्यात आला.

४५ वर्षीय नितीन नबीन हे भाजपचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. त्यांच्याआधी अमित शहा यांची वयाच्या ४९ व्या वर्षी पक्षाचे



राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. सोमवारी भाजप मुख्यालयात अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्याने नितीन नबीन यांची बिनविरोध निवड झाली. १४ डिसेंबर २०२५ रोजी नितीन यांना पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष बनवण्यात आले होते.

सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नितीन नबीन यांचे पीएम मोदी यांनी अभिनंदन केले. नितीन नबीन यांच्यावर सध्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनण्यापूर्वी नितीन नबीन यांनी दिल्लीतील विविध मंदिरांना भेट देत दर्शन घेतले. त्यांनी गुरुद्वारा बांगला साहिब, झंडेवालन मंदिर, वाल्मिकी मंदिर आणि कॅनॉट प्लेसमधील हनुमान मंदिराला भेट दिली आणि पूजा केली.पीएम मोदी यांनी नितीन नबीन यांचे कौतुक करत सांगितले की, 'भाजप हा असा पक्ष आहे जिथे लोकांना वाटेल की मोदीजी इतक्या लहान वयात मुख्यमंत्री झाले. ते सरकारचे प्रमुख झाले आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे मी भाजपचा कार्यकर्ता आहे. पण मला वाटते की नितीनजी माझे बॉस आहेत मी एक कार्यकर्ता आहे.'

'नितीन नबीन हे आपल्या सर्वांचे अध्यक्ष आहेत. त्यांची जबाबदारी फक्त भाजपचे व्यवस्थापन करणे नाही तर एनडीएशी समन्वय साधणे देखील आहे. नितीन जी यांच्या संपर्कात आलेला कोणीही त्यांच्या साधेपणा आणि सहजतेबद्दल बोलतो. भाजप युवा मोर्चाचे नेतृत्व करणे असो किंवा राज्य प्रभारी म्हणून काम करणे असो नितीनजी यांनी त्यांनी घेतलेली प्रत्येक जबाबदारी पूर्ण केली आहे.'

नितीन नबीन यांचे वडील नबीन किशोर प्रसाद सिन्हा हे भाजपचे वरिष्ठ नेते होते. ते पाटणा पश्चिम विधानसभा मतदारसंघातून चार वेळा आमदार झाले होते. २३ मे १९८० रोजी रांची येथे नितीन नबीन यांचा जन्म झाला होता. त्यांनी सीबीएसई शाळेतून दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले आणि पुढचे शिक्षण त्यांनी दिल्लीतून पूर्ण केले. दीपमाला श्रीवास्तव या नितीन नबीन यांच्या पत्नी आहेत. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे.येणारी २५ वर्ष खूप महत्त्वाची आहे. हा तो काळ आहे ज्यात विकसित भारत निर्माण होणार आहे. या महत्त्वपूर्ण कालखंडात नितीन नबीन भाजपाचा वारसा पुढे नेणार आहेत असा विश्वास नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

## खामगाव-अकोला मार्गावर पहाटे भीषण अपघात

### भरधाव कारची ट्रकला धडक, भीषण अपघातात एकाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०खामगाव**

खामगाव-अकोला मार्गावर आज पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने चालत्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. तर कारमधील आणखी एक जण सुदैवाने किरकोळ दुखापतींसह बचावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास खामगावहून अकोल्याच्या दिशेने जाणारी कार अतिवेगात होती. दरम्यान, पुढे चाललेल्या ट्रकवर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारने ट्रकला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कारचा पुढील भाग पूर्णतः चिरडला गेला. अपघातात कारमधील प्रवासी अडकून पडले होते.




अपघाताची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी कारमधील जखमींना बाहेर काढून उपचारासाठी तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, एका प्रवाशाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.या अपघातामुळे काही काळ खामगाव-अकोला मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे नेमके कारण अतिवेग आणि निष्काळजी वाहनचालना असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस अधिक तपास करत असून अपघातातील मृत व जखमींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या मार्गावर वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## कापूस उत्पादकांचे ३ महिन्यांत अडीच हजार कोटींचे नुकसान; सीसीआयची खरेदीत दिरंगाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

केंद्र सरकारने १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या तीन महिन्यांसाठी कापसावरील ११ टक्के आयात शुल्क रद्द केल्याने दर दबावात आले. याच काळात शेतकऱ्यांचा कापूस बाजारात यायला सुरुवात झाली आणि सीसीआयने एमएसपी दराने कापूस खरेदी करण्यास दिरंगाई केली. या काळात व्यापाऱ्यांनी ६६.०६ टक्के कापूस बाजारभावाने म्हणजेच एमएसपीपेक्षा कमी दराने खरेदी केल्याने देशातील कापूस उत्पादकांचे सरासरी २,२३३.३७ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

ऑल इंडिया कॉटन ब्रोकर्स असोसिएशनच्या आकडेवारीनुसार १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या तीन महिन्यांत देशभरातील बाजारात एकूण १४७ लाख ३१ हजार ४४१ गाठी (२,५०,४३,४४९.७ क्विंटल) कापूस बाजारात आला. यातील ५० लाख गाठी (८५ लाख क्विंटल) कापूस सीसीआयने खरेदी केल्याने उर्वरित ९७ लाख ३१ हजार ४४१ गाठी (१,६५,४३,४४९.७क्विंटल) कापूस व्यापाऱ्यांनी प्रतिक्विंटल ६,४०० ते ७,१०० रुपये दराने खरेदी केला. त्यामुळे शेतकऱ्यांना एमएसपीपेक्षा प्रतिक्विंटल १,००० ते १,७०० रुपये कमी मिळाले.

आयात शुल्क रद्द केल्याने कापसाची आयात वाढली आणि देशातील शेतकऱ्यांना एमएसपीपेक्षा कमी दराने कापूस विकावा लागल्याने त्यांचे किमान




**राज्यनिहाय कापूस आवक व खरेदी (गाठी)**
**(१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५)**

| राज्य | एकूण आवक | सीसीआय | व्यापारी |
|---|---|---|---|
| १) पंजाब | १,१४,२४७ | - | - |
| २) हरयाणा | ४,६१,८७१ | - | - |
| ३) राजस्थान | १४,९१,०७१ | - | - |
| ४) गुजरात | २७,३५,८९४ | १,९७,००० | २५,३६,८९४ |
| ५) महाराष्ट्र | ३३,३५,२९४ | ५,९१,००० | २७,४४,२९४ |
| ६) मध्य प्रदेश | ९,०३,३८८ | १,८३,००० | ७,२०,३३८ |
| ७) तेलंगणा | २७,६६,१७६ | २०,००,००० | ७,६६,१७६ |
| ८) आंध्र प्रदेश | १०,६७,६४७ | १,६१,००० | ८,५४,६४७ |
| २) कर्नाटक | १७,१५,२९४ | ३,६३,००० | १३,७९,२९४ |
| १०) तामिळनाडू | ४,७६५ | - | - |
| ११) ओडिशा | १,३१,०२९ | ४४,००० | ८७,०२९ |
| १२) इतर | ४,७६५ | | |

१,६५४ कोटी ३४ लाख ४९ हजार ७०० रुपये, तर कमाल २,८१२ कोटी ३८ लाख ६४ हजार ४९० रुपयांचे म्हणजेच सरासरी २,२३३ कोटी ३६ लाख ५७ हजार ९५ रुपयांचे नुकसान केले आहे.

**सीसीआयची ३३.९४ टक्के खरेदी**

कापूस वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यात सीसीआयने देशभरात ३३.९४ टक्के कापूस खरेदी केला. सीसीआयने सुरुवातीला ओलाव्याचे कारण पुढे करून शेतकऱ्यांकडील कापूस एमएसपीपेक्षा कमी म्हणजेच प्रतिक्विंटल ७,६०० ते ८,१०० रुपये दराने खरेदी केला.

कापूस उत्पादकता व खरेदीची जिल्हानिहाय अट, ऑनलाइन नोंदणीची क्लिष्ट पद्धती आणि खरेदी केंद्र सुरू करण्यास केलेली दिरंगाई पाहता सीसीआय व सरकार एमएसपी दराने कापूस खरेदी करण्यास फारसे नसल्याचे स्पष्ट झाले.

## महाराष्ट्रात गुंतवणुकीचा पाऊस अन् ३५ लाख नोकऱ्यांची संधी

### दावोसमध्ये फडणवीसांची मोठी घोषणा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दावोस**

राज्यामध्ये महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोसला रवाना झाले आहेत. दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम पार पडत त्यामध्ये राज्याला १ लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याच्या दिशेने करार केले गेले आहेत. त्यामुळे राज्यामध्ये अनेक कंपन्या आणि रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. याबाबत स्वत: मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली.

**काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ?**

दावोसमध्ये माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले की,महाराष्ट्रात गुंतवणुकीचा पाऊस पडेल ३५ लाख नोकऱ्यांची संधी निर्माण होईल असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोसमध्ये म्हटलं आहे. राज्यामध्ये सध्या तिसरी मुंबई उभी राहत असून या क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक मिळण्याचे संकेत देखील फडणवीसांनी दिले आहेत.यामध्ये सुमारे दहा ते बारा वेगवेगळ्या क्षेत्रातील उद्योगांशी सध्या समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. नवी मुंबई विमानतळाजवळ एज्युसिटी इनोव्हेशन सिटी स्पोर्ट्स सिटी आणि मेडी सिटी यासारखे प्रकल्प उभारले जात आहेत. ज्यातून राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल तसेच यामध्ये ३५ लाख उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण होतील. असंही त्यांनी सांगितलं .

## यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुका जाहीर

### आरबीआयच्या निर्देशांमुळे जुने संचालक अडचणीत

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२०यवतमाळ**

राज्यात नुकत्याच महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर लगेचच आता जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडणार आहेत. अशातच यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेचा निवडणूका देखील जाहीर करण्यात आल्या आहेत. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेचा निवडणूक कार्यक्रम सुरू झाला असून प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. अशातच जिल्हा बँकेत अनेक वर्षांपासून सलग संचालक म्हणून निवडून येणाऱ्यांवर निवडणूक बंदीची टांगती तलवार आली आहे.

आरबीआयच्या निर्देशाप्रमाणे सलग १० वर्षे संचालक राहणाऱ्यांना निवडणूक लढविण्याची बंदी घालण्यात आली आहे. या निर्देशाविरोधात काही संचालकांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली आहे.




या निर्णयामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेतील २१ पैकी ११ संचालक सातत्याने निवडून आले आहेत. ठरावीक मतदारसंघात त्यांचा प्रभाव असल्याने तेथून ते बँकेत कायम राहिले आहेत.आता अशा संचालकांच्या बाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काही निकष घालून दिले आहेत. त्यासाठी २०२० मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत सलग दहा वर्षे संचालक म्हणून निवडून येणाऱ्यांना आता निवडणूक लढता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

मध्यवर्ती बँकेत सलग निवडून येणाऱ्या संचालकांना जबर धक्का बसला आहे. त्यांना स्वतःच्या जागेवर कुटुंबातील सदस्याला किंवा सहकाऱ्याला संधी देण्याची वेळ ओढवली आहे. या निर्णयाच्या विरोधात नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. आरबीआयचे निर्देश पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येऊ नये, अशी मागणी याचिकाकर्त्या संचालकांनी केलेली आहे. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी २२ जानेवारी रोजी ठेवली आहे.

## शिंदेसेनेचे नगरसेवक हॉटेलमधून बाहेर पडणार; नव्या रणनीतीने नगरसेवकांमध्ये नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० मुंबई**

महापालिकेतील सत्ता समीकरणात सुरू झालेल्या हॉटेल पॉलिटिक्समुळे शिंदेसेना चांगलीच चर्चेत आली. मुंबईत भाजपाला ८९ आणि शिंदेसेनेला २९ जागा जिंकता आल्या. त्यात बहुमताचा आकडा गाठण्यासाठी भाजपाला शिंदेसेनेची गरज भासणार आहे. मात्र निकालाच्या दुसऱ्याच दिवशी शिंदेसेनेचे नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्कामाला गेले. नव्या नगरसेवकांचे शिबिर असल्याचं शिंदेसेनेकडून सांगण्यात येत होते. मात्र पडद्यामागे शिंदेसेना महापौरपदासाठी भाजपावर दबावतंत्र वापरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती.

या सर्व घडामोडीची दखल केंद्रीय पातळीवर भाजपा नेतृत्वानेही घेतली आणि महापौरपदाबाबत तडजोड करणार नाही असा संदेश राज्यातील नेतृत्वाला दिला. त्यातच आता शिंदेसेनेचे नगरसेवक हॉटेलमधून बाहेर पडत आहेत. मात्र या २९ नगरसेवकांचे सर्व मूळ दस्तावेज पक्षाने त्यांच्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हॉटेलमधून हे सर्व नगरसेवक आपापल्या मतदारसंघात जाणार आहेत. पक्षाने जी कागदपत्रे विजयी नगरसेवकांकडून घेतली आहेत त्यात १६ तारखेला निकालानंतर मिळालेल्या निवडीचे प्रमाणपत्रही आहे. त्याशिवाय सर्व नगरसेवकांचे आधार कार्डही पक्षाने घेतले आहे.

## राज्यातील मृत्यूचे सापळे आता 'हायटेक' तंत्राच्या निगराणीखाली; ९२३ कोटींच्या खर्चाला मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी गृह विभागाने एक मोठे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील एकूण २१,४०० किमी लांबीच्या रस्त्यांवरील ८६१ अपघातप्रवण क्षेत्रांवर 'ब्लॅक स्पॉट्स' आता 'इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' कार्यान्वित केली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ९२३.०५ कोटी रुपयांच्या खर्चाला गृह विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या प्रणालीचे वैशिष्ट्य म्हणजे ही पूर्णपणे बिनतारी वायरलेस तंत्रज्ञानावर आधारित असेल. यासाठी ४ जी आणि ५ जी मोबाइल तंत्रज्ञानाचा वापर केला



जाणार आहे.नागपूर, अकोला, अमरावती आणि चंद्रपूर या भागातील यंत्रणेसाठी२३२.५५ कोटी खर्चाला मान्यता देण्यात आली आहे.

**२४ तास निगराणी, सौरऊर्जेवर चालणार उपकरणे**

विद्युत ऊर्जेसाठी सौरऊर्जेचा किंवा उपलब्ध स्रोतांचा वापर केला जाईल. यामुळे रस्ते सुरक्षेवर रिअल-टाइम लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने रस्ते सुरक्षेबाबत दिलेल्या निर्देशांनुसार स्थापन करण्यात आलेल्या 'रस्ते सुरक्षा निधी नियंत्रण समिती'ने या प्रकल्पाचा प्रस्ताव तयार केला होता. दरम्यान, या प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने त्याचे विभाजन तीन मुख्य विभागात करण्यात आले आहे.

या यंत्रणेद्वारे प्रामुख्याने मोकळ्या महामार्गांवर वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर आपोआप कारवाई होईल. विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्यांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी 'रियल-टाइम अलर्ट' मिळतील. तथा नियमांचे उल्लंघन झाल्यास थेट वाहनधारकाच्या मोबाइलवर आणि नियंत्रण कक्षात माहिती दिली जाईल.

**अपघातांवर नियंत्रण मिळविण्याचे लक्ष्य**

या अद्ययावत प्रणालीमुळे अतिवेग, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवता येईल, ज्यामुळे मृत्यूचे प्रमाण घटण्यास मदत होईल. संपूर्ण प्रकल्पाच्या वीज जोडणीसाठी स्वतंत्र ६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विदर्भातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि महत्त्वाच्या जिल्हा मार्गावरील अशा ठिकाणांची निवड करण्यात आली आहे, जिथे अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यासाठी अपघातांची जास्त संख्या असणारे मार्ग आणि जिल्ह्यांची निवड केली जाणार आहे. सबंधित जिल्ह्याला निधी देऊन यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

## संपादकीय ......

# रणनीतिकार निशाण्यावर

*निवडणुकांतील रणनीती आता नेत्यांपुरती मर्यादित न राहता कॉर्पोरेट कंपन्यांच्या वॉर रूमपर्यंत पोहोचली आहे. सत्तानिर्मितीत निर्णायक भूमिका बजावणार्या या रणनीतिकार कंपन्या स्वतःच सत्तासंघर्षाच्या केंद्रस्थानी येऊ लागल्या आहेत.निवडणुकांच्या काळात सत्ताधारी पक्षांकडून विरोधी पक्षांच्या नेत्यांवर, त्यांच्या निकटवर्तीयांवर किंवा पक्षाच्या संघटनात्मक रचनांवर तपास यंत्रणांची कारवाई होणे, ही भारतीय राजकारणातील जुनी आणि रूढ बाब आहे. ही एक अशी वास्तवता आहे, जी राजकीय नेते आणि पक्ष दोघेही गृहीत धरून चालतात. सत्तासंघर्षात अशा कारवाया होतील, याची तयारी प्रत्येक राजकीय खेळाडू ठेवतो. मात्र, गेल्या काही वर्षांत या संघर्षाचे स्वरूप लक्षणीयरीत्या बदलले. आता तपास यंत्रणांचे लक्ष्य केवळ राजकीय नेते राहिलेले नाहीत, तर राजकीय पक्षांसाठी निवडणूक रणनीती आखणार्या कंपन्याही थेट या संघर्षात ओढल्या जात आहेत. कोलकात्यात इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी (आय-पॅक) च्या कार्यालयांवर आणि वरिष्ठ पदाधिकार्यांच्या ठिकाणांवर झालेली छापेमारी या बदलत्या राजकीय वास्तवाचे ठळक उदाहरण आहे. ही कारवाई केवळ कायद्याच्या चौकटीत पाहण्यापुरती मर्यादित न राहता, सत्ता आणि रणनीतीकार यांच्यातील संघर्षाचे प्रतीक ठरते.स्वातंत्र्यनंतरपासून १९९०च्या दशकापर्यंत भारतीय राजकारणात रणनीती हा स्वतंत्र किंवा व्यावसायिक घटक नव्हता. ती राजकारणाचाच एक स्वाभाविक भाग होती. काँग्रेससारख्या पक्षांचा विस्तीर्ण संघटनात्मक ढांचा, स्थानिक नेत्यांचे जाळे, सामाजिक समतोल आणि उमेदवार निवडीची प्रक्रिया हीच त्यांची रणनीती होती. काही व्यक्ती निर्णय प्रक्रियेत प्रभावी भूमिका बजावत असत; मात्र त्यांना रणनीतीकार असे संबोधले जात नव्हते. राजीव गांधींच्या काळात संगणक आणि डेटा वापराची सुरुवात झाली. मात्र, तो वापरही पक्षांतर्गत मर्यादांमध्येच होता. अरुण नेहरू आणि आरिफ मोहम्मद खान यांसारखे नेते डेटा आणि विश्लेषणाच्या आधारे निर्णय प्रक्रियेला दिशा देत होते. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींच्या हत्येनंतर निर्माण झालेली सहानुभूतीची लाट मतांमध्ये रूपांतरित करण्यासाठी कोणत्याही व्यावसायिक संस्थेची गरज भासली नव्हती. त्या काळात माध्यमांचा विस्तार मर्यादित होता, संवादाचा आवाका लहान होता आणि त्यामुळे रणनीतीही त्या चौकटीत प्रभावी ठरत होती. म्हणूनच हा काळ 'रणनीतीचा पूर्व-कॉर्पोरेट टप्पा' मानला जातो.*

*१९९० नंतर भारतीय राजकारणात मूलभूत बदल घडून आले. आघाडीचे राजकारण सुरू झाले, प्रादेशिक पक्ष बळकट झाले आणि सत्तेचे गणित अधिक गुंतागुंतीचे बनले. या टप्प्यावर रणनीती अधिक महत्त्वाची ठरू लागली. तरीही त्या काळातही कोणत्याही कॉर्पोरेट कंपन्या सक्रिय नव्हत्या. मात्र, काही व्यक्ती 'राजकीय चाणक्य' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. ओडिशातील नवीन पटनायक यांचे उदाहरण यासाठी महत्त्वाचे ठरते. बीजू जनता दल दीर्घकाळ भाजपसोबत युतीत होता. मात्र, २००८ च्या कंधमाळ दंगलीनंतर परिस्थिती बदलली. भाजपपासून वेगळे होण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय कोणत्याही कंपनीच्या नव्हे, तर पक्षाच्या प्रमुख रणनीतीकार प्यारी मोहन मोहापात्रा यांच्या सल्ल्यावर आधारित होता. २००९ मध्ये बीजेडीने एकट्याने निवडणूक लढवून बहुमत मिळवले. यामुळे हे स्पष्ट झाले की, रणनीती ही संकल्पना कंपन्यांपूर्वीही अस्तित्वात होती, फक्त तिचा चेहरा व्यक्तींचा होता, संस्थांचा नव्हता.*

*२०१० नंतर मात्र सोशल मीडिया, स्मार्टफोन, बिग डेटा आणि मायक्रो टार्गेटिंग या संकल्पना थेट निवडणूक राजकारणाचा भाग बनल्या. २०१४ ची लोकसभा निवडणूक या बदलाचे प्रतीक ठरली. निवडणूक प्रचार पहिल्यांदाच एखाद्या ब-ँड मोहिमेसारखा आखण्यात आला. याच काळात आय-पॅक सारख्या व्यावसायिक रणनीती कंपन्यांचा उदय झाला. २०१३ मध्ये स्थापन झालेल्या आय-पॅकने निवडणूक रणनीतीला एक व्यावसायिक आणि संघटित स्वरूप दिले. 'अबकी बार, मोदी सरकार' हा नारा, ग्राऊंड लेव्हल नेटवर्क, सोशल मीडिया व्यवस्थापन आणि संदेशांची अचूक मांडणी यामुळे २०१४ मध्ये भाजपला मोठे यश मिळाले. यानंतर हे मॉडेल देशभर पसरले.*

*सुनील कनुगोलू यांच्या असोसिएशन ऑफ बिलियन माईंडस् (एबीएम) ने काँग्रेससाठी कर्नाटक, तेलंगणा आणि छत्तीसगडमध्ये प्रभावी रणनीती आखली. २०१५ मध्ये बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या विजयामागे प्रशांत किशोर यांच्या आय-पॅक कंपनीची भूमिका महत्त्वाची होती. त्यांनी एक लोकप्रिय नारा दिला. 'बिहार में बहार है, नितीश कुमार है'. याच कंपनीने २०१६ मध्ये पंजाबमध्ये कॅप्टन अमरिंदर सिंग यांचे पुनरागमन करून दिले. त्यानंतर २०१७ मध्ये 'बांग्लार गोरबो ममता' हा लोकप्रिय नारा देत तृणमूल काँग्रेसची सत्ता कायम राखण्यात भूमिका बजावली. अशाच एका कंपनीने २०२१ मध्ये 'स्टालिन थलैमै' आणि 'विनैथु सेय्वोम' हा नारा देऊन द्रमुकला सत्तेत बसवले. हळूहळू राजकारणाचा मोठा भाग या कंपन्यांच्या भोवती फिरू लागला. डेटा, सर्वेक्षण, सोशल मीडिया नॅरेटिव्ह आणि मतदारांचे विश्लेषण हे सर्व या कंपन्यांच्या हातात केंद्रित होऊ लागले. परिणामी, पक्षांच्या धोरणांवरही या इनपुटस्चा प्रभाव वाढला. याच ठिकाणी संघर्षाची बीजे रोवली गेली. जेव्हा रणनीती तयार करणार्या कंपन्या थेट सत्तानिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या, तेव्हा त्या स्वतःच सत्तासंघर्षाचा भाग बनल्या. जानेवारी २०२६ मध्ये आय-पॅकवर सक्तवसुली संचालनालयाची छापेमारी, सुनील कनुगोलू यांच्या कंपनीवर तेलंगणात पोलिसांची कारवाई, नरेश अरोडांच्या कंपनीवर पुण्यात आयकर विभागाची छापेमारी या सर्व घटना याच संघर्षाचे परिणाम मानल्या जातात.*

*या पार्श्वभूमीवर प्रश्न निर्माण होतो की, या कारवाया केवळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आहेत की राजकीय रणनीतीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न आहेत? सत्ताधारी पक्षांना हे ठाऊक आहे की, आज निवडणुका केवळ नेत्यांच्या करिष्म्यावर जिंकल्या जात नाहीत. डेटा, संदेशांची अचूक मांडणी आणि मायक्रो टार्गेटिंग निर्णायक ठरते. आणि ही ताकद ज्या कंपन्यांकडे असते, त्या सत्ताधार्यांना अस्वस्थ करणार्या ठरू शकतात. विशेषतः, जर या कंपन्या विरोधी पक्षांसाठी काम करत असतील तर. जागतिक स्तरावर पाहता, अमेरिका आणि युरोपमध्ये राजकीय कन्सल्टन्सी हा एक जुना आणि प्रस्थापित उद्योग आहे. मात्र, भारतात सत्ता आणि तपास यंत्रणा यांच्यातील सीमारेषा अधिक धूसर आहे. तपास यंत्रणा थेट सरकारच्या अधिपत्याखाली असल्याने, रणनीती कंपन्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आल्यावर त्या थेट सत्तासंघर्षाच्या परिघात येतात. हीच भारतीय राजकारणातील कॉर्पोरेटायझेशनची सर्वात गुंतागुंतीची आणि धोकादायक बाजू आहे.*

# आता लाडकी बहीण योजनेसाठी आधार प्रमाणीकरण



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती,** : राज्यातील महिलांच्या आधिक स्वातंत्र्य, तसेच आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यामाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहोण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभाची महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यात मान्यता देण्यात आली आहे. योजनेतील लाभार्थ्यांची १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे आवश्यक होते. ऑनलाईन ई-केवायसी करताना पतीचे किंवा वडिलांचे आधार कार्ड नोंदवून ओटीपी प्राप्त झाल्यानंतर ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण होत होती. परंतु विधवा, परितक्त्या, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला, घटस्फोटीत, एकल व ज्यांचे वडील मृत्यू पावले आहेत, अशा महिलांना ई-केवायसी करण्यात अडचण निर्माण होत होती. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत वाढवून ई-केवायसी प्रक्रिया राबवित असताना लाभार्थ्यांकडून पर्याय निवडताना संभ्रम असल्यामुळे ई-केवायसी करताना चुका झाल्यास किंवा पती किंवा वडील ह्यात नसलेल्या, तसेच घटस्फोटीत लाभार्थांची ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी किंवा अद्याप ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण केली नसल्यास यासाठी एडीट ऑप्शन देण्यात आला होता.

१८ नोव्हेबर २०२५ पर्यंत ऑनलाईन ई-केवायसी करताना पर्याय देण्यात आले होते. यात माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी माणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानंतर निवृत्तीवेतन येत नाहीत. पर्याय : होय/नाही, माझ्या कुटुंबातील केवळ एक विवाहीत व एक अविवाहीत महिला योजनेचा लाभ घेत आहे. पर्याय होय / नाही, या पर्यायापैकी लाभार्थ्यांनी नाही हा पर्याय निवडल्यामुळे लाभाथ्यांचे अर्जामध्ये रिमार्क एघधउर्त्रेेंंएा१आणि स्टेटस रिजेक्ट दाखवत आहे. त्यामुळे अर्जदाराचे लाभ बंद झाले आहेत. लाभार्थ्यांनी ऑनलाईन स्टेटस तपासणी करावयाची असल्यास सेतू केंद्र, सायबर कॅफे, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, संबंधीत तालुका, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प किंवा जिल्हा महिला व बाल अधिकारी, अमरावती येथे तपासणी करु शकतील. त्यासाठी केवळ जिल्हास्तरावरील कार्यालयात येणाची आवश्यकता नाही. याबाबत ई-केवायसी प्रक्रीया पुन्हा करण्यासाठी एडीट ऑप्शन पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे, असे जिल्हा महिला व बाल अधिकारी अतुल भडांगे यांनी कळविले आहे.

# मंत्रालयीन विभागांना आता द्यावे लागेल वेळेत उत्तर

## विधानमंडळ कामकाजासाठी नव्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई-**

विधानमंडळातील प्रश्न, लक्षवेधी, स्थगन प्रस्ताव, आश्वासने आणि विधेयकांवरील उत्तरे देताना मंत्रालयीन विभागांकडून होत असलेल्या दिरंगाईला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने कामकाज हाताळण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार आता प्रत्येक संसदीय आयुधांवर ठराविक मुदतीत, वस्तुनिष्ठ आणि जबाबदारीने उत्तर देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सरकारने २ डिसेंबर १९९८चा शासन निर्णय रद्द करून हे नवे परिपत्रक जारी केले.

आश्वासनांची ९० दिवसांत पूर्तता

मंत्र्यांनी सभागृहात दिलेली आश्वासने ९० दिवसांच्या आत पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. संबंधित विभागांनी तत्काळ कार्यवाही सुरू करावी, असे सरकारने स्पष्ट केले. दोन वर्षांहून अधिक प्रलंबित असलेल्या आश्वासनांसाठी विशेष मोहीम राबवावी, निर्देशही देण्यात आले आहेत.

प्रश्नावर तुमचे मत नको

प्रश्नांची उत्तरे ३० दिवसांत पाठवावीत. प्रश्न संबंधित विभागाशी संबंधित नसल्यास तो योग्य विभागाकडे हस्तांतरीत करावा लागेल. मात्र, प्रश्न स्वीकारण्याबाबत मत व्यक्त करू नये.

लक्षवेधी, स्थगन प्रस्ताव

लक्षवेधीबाबत 'सूचना योग्य नाही', अशा भाषेस मनाई केली आहे. स्थगन प्रस्तावांबाबत अध्यक्ष, सभापतींनी निवेदन देण्याचे आदेश दिल्यास, सरकारला निवेदन करावे लागेल.




विधेयके व ठराव

शासकीय विधेयकांवरील चर्चेसाठी संबंधित मंत्र्यांना आधीच सविस्तर, स्पष्ट टीपण देणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशासकीय विधेयके, ठरावांबाबत शेवटच्या क्षणाची वाट न पाहता विभागांनी आधीच तयारी करण्याचे आदेश आहेत. विधानमंडळातील कामकाज अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण व्हावे, तसेच सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर सरकारची जबाबदारी निश्चित व्हावी, हा या नव्या सूचनांचा मुख्य उद्देश असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## आरोग्य संपदा — आहार विशेष

# पालक भाजी खाण्याचे काय फायदे आहेत?

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक –** पालक खाण्याचे अनेक फायदे आहेत, कारण त्यात भरपूर जीवनसत्त्वे (–, उ, घ), खनिजे (लोह, पोटॅशियम), फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, डोळ्यांचे आरोग्य सुधारते, पचनक्रिया चांगली राहते, हाडांना बळकटी मिळते, रक्तदाब नियंत्रित राहतो, हृदयाचे आरोग्य सुधारते, त्वचेला चमक येते आणि कर्करोगाचा धोका कमी होतो.



**पालक खाण्याचे प्रमुख फायदे:**

रोगप्रतिकारशक्ती वाढवते: व्हिटॅमिन सी, बीटा-कॅरोटीन आणि इतर अँटीऑक्सिडंट्समुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते.

डोळ्यांसाठी उत्तम: ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन सारखे अँटीऑक्सिडंट्स वयानुसार होणाऱ्या डोळ्यांच्या समस्यांपासून संरक्षण देतात.

पचनसंस्थेसाठी फायदेशीर: फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत चालते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते.

हाडांना बळकटी: व्हिटॅमिन के (तळींराळप घ) मुळे हाडे मजबूत होतात आणि कॅल्शियमचे शोषण सुधारते.

रक्तदाब नियंत्रित: पोटॅशियममुळे रक्तवाहिन्या शिथिल होतात आणि रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

हृदयाचे आरोग्य: नायट्रेट्स (छळींरींशी) रक्तप्रवाह सुधारतात, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

ऊर्जेची पातळी वाढवते: लोहामुळे शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा होतो, ज्यामुळे थकवा जाणवत नाही.

त्वचा आणि केसांसाठी: अँटीऑक्सिडंट्स त्वचेला तरुण ठेवतात आणि केसांच्या आरोग्यासाठीही उपयुक्त आहेत.

कर्करोगाचा धोका कमी: यात असलेले अँटीऑक्सिडंट्स काही कर्करोगांचा धोका कमी करू शकतात.

वजन नियंत्रणात मदत: फायबरमुळे पोट भरलेले राहते आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

पालक सॅलड, भाजी, सूप किंवा ज्यूसच्या स्वरूपात खाऊ शकता, ज्यामुळे तुम्हाला या सर्व पोषक तत्वांचा फायदा मिळेल.

# ढगाळ हवामानामुळे गहू पिकावर येवू शकतो 'हा' रोग; लक्षणे दिसताच त्वरित करा अशी फवारणी

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**

गहू पिकावरील तांबेरा (गंज रोग) नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

गहू पिकावर तांबेरा (गंज रोग) हा एक गंभीर बुरशीजन्य रोग असून, वेळेवर उपाययोजना न केल्यास उत्पादनात मोठी घट होऊ शकते.

या पार्श्वभूमीवर कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना खालील प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना सुचविल्या आहेत.

**प्रतिकारक वाणांचा वापर**

गहू पिकावर तांबेरा रोग टाळण्यासाठी प्रतिकारक वाणांची निवड महत्त्वाची आहे.

'फुले समाधान', 'फुले अनुपम', 'कऊ २१८९', 'पुण्या', 'परभणी-५१', 'त्र्यंबक', 'गोदावरी', 'तपोवन' आणि 'शरद' हे वाण तांबेरा रोगास प्रतिकारक असल्याने त्यांचा वापर करावा.

**लक्षणे दिसताच फवारणी**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पानांवर नारंगी किंवा काळ्या रंगाचे ठिपके दिसू लागताच बुरशीनाशकांची फवारणी सुरू करावी.

तांबेरा रोगाची लक्षणे आढळताच त्वरित फवारणी करणे आवश्यक आहे.

यामध्ये टेबुकोनाझोल ५० टक्के ट्रायफ्लोक्सीस्ट्रोबिन २५ टक्के डब्ल्युजी हे बुरशीनाशक ६ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गरज भासल्यास १५ दिवसांनी दुसरी फवारणी घ्यावी.




तसेच मॅन्कोझेब ७५ टक्के डब्ल्यूपी किंवा झिनेब ७५ टक्के डब्ल्युपी हे बुरशीनाशक ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येते.

याशिवाय प्रवायकोनाझोल २५ टक्के एसी (९० मिली), क्रेसॉसिम मिथाइल ४४.३ टक्के एससी (१० मिली) किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के डब्ल्यूपी (३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) यापैकी कोणतेही एक बुरशीनाशक वापरण्याचा सल्ला दिला आहे.

रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन १० ते १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी घ्यावी.

**इतर उपाययोजना**

रोगग्रस्त पाने त्वरित काढून नष्ट करावीत.

शेतीत पाण्याचा अतिवापर टाळून योग्य जलनियोजन ठेवावे.

तसेच पेरणीपूर्वी गांडूळ खत किंवा सेंद्रिय खतांचा वापर केल्यास पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

पाणी मर्यादित स्वरूपात आवश्यकतेनुसार द्यावे.

**शेतात अतिरिक्त ओलावा राहणार नाही याची काळजी घ्यावी.**

या उपाययोजना वेळेवर, योग्य मात्रेत आणि शास्त्रीय पद्धतीने केल्यास गहू पिकावरील तांबेरा (गंज) रोगाचे प्रभावी नियंत्रण करता येईल.

# माहुली चोर येथे श्रमदानातून वनराई बंधारा उभारला

## भूजल पातळी वाढणार, प्राणी-पशुपक्ष्यांनाही मिळणार पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०माहूली चोर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोर ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने 'ग्राम समृद्ध अभियान' अंतर्गत वनराई बंधारा उभारण्यात आला आहे. गावाजवळून वाहणाऱ्या नाल्याच्या पात्रात हा बंधारा बांधण्यात आला असून, यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. तसेच, जंगलातील प्राणी आणि पशुपक्ष्यांनाही पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.

ग्रामविकास विभागांतर्गत राबवण्यात येत असलेल्या या उपक्रमातून जिल्हा परिषद प्रशासनाने माहुली चोरसह इतर गावांमध्येही वनराई बंधारे बांधण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक गावांमध्ये असे बंधारे बांधले जात आहेत, ज्यामुळे तालुक्यातील पाणी पातळीत वाढ होण्यास सुरुवात झाली आहे.



माहुली चोर येथील वनराई बंधारा बांधण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर श्रमदान केले. त्यांच्या सहभागामुळे 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे शक्य झाले आहे. सध्या इतर गावांमध्येही वनराई बंधाऱ्यांचे काम सुरू असून, शासनाचा जलसंधारणाचा उद्देश मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहे.

या बंधाऱ्यांमध्ये अडलेल्या पाण्याचा उपयोग जंगलातील प्राणी, पशुपक्ष्यांना पिण्यासाठी होतो. याशिवाय, शेतकरी शेतीसाठी संरक्षित पाणी म्हणून त्याचा वापर करू शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते.

या जलसंवर्धनाच्या कामात गावातील अनेक नागरिकांनी श्रमदान केले. यात सरपंच संगीता झंझाड, उपसरपंच राजेंद्र सरोदे, सदस्य सुधा जाधव, विभा ढगे, रोशन पवार, अरविंद गाडेकर, ग्रामपंचायत अधिकारी अरुण रायबोले, सहाय्यक कृषी अधिकारी पंकज लाडके, बंडू जाधव, शुभांगी नाळे, कांचन नाळे, दिनेश खंडारे, प्रवीण जाधव, कोतवाल मनीषा लोहकरे, रोहित क्षीरसागर, रोजगार सेवक गजानन गाडेकर, मोतीराम गोतमारे, महादेव गादे, प्रणव सरोदे, समर्थ नाळे, किसन डुकरे, वैशाली गाडेकर, अनिता झंझाड आणि इतर युवकांचा सहभाग होता.

वनराई बंधाऱ्याची निर्मिती 'वेस्ट टू बेस्ट' या संकल्पनेवर आधारित आहे. यात वापरात नसलेल्या स्थानिक संसाधनांचा उपयोग केला जातो. प्रामुख्याने सिमेंटच्या रिकाम्या पिशव्यांमध्ये नदी किंवा नाल्यातील रेती भरून त्यांचे एकावर एक थर पाण्याच्या प्रवाहाच्या आडवे रचले जातात. सिमेंटच्या घट्ट कापडी पिशव्यांमधून पाणी वाहून जात नाही, ज्यामुळे पाणी अडवले जाते.

# पोलीस मुख्यालय मैदानावर प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती,**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा यावर्षी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता पार पडणार आहे.दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा अमरावती येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे साजरा केला जातो. मात्र, या स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू आहे. या कामामुळे यावर्षी कार्यक्रम घेणे शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२६ चा सोहळा पोलीस मुख्यालय परेड मैदानावर घेण्यात येणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. २० जानेवारी २०२६


शहर/ग्रामिण

# अमरावती मनपा स्वीकृत नगरसेवक संख्या झाली ९

## महापौर, उपमहापौर निवडीसह १५ फेब्रुवारीपूर्वी पहिल्या बैठकीत निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती–** अमरावती महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांची संख्या ५ वरून थेट ९ झाली आहे. सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त १० सदस्य असा मनपा अधिनियमात सुधारणा केल्याने ही वाढ झाली आहे.हे स्वीकृत सदस्य महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडीसाठी होणाऱ्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्या बैठकीत निवडले जातील. मतमोजणीच्या दिवसापासून साधारणतः महिनाभरात ही बैठक घेण्याचे निर्देश असल्याने, ती आगामी १५ फेब्रुवारीपूर्वी होण्याची शक्यता आहे.गेल्या निवडणुकीवेळी स्वीकृत नगरसेवकांची संख्या केवळ पाच होती. मात्र, २३ मार्च २०२३ रोजी शासनाने मनपा अधिनियमात केलेल्या सुधारणांमुळे हा बदल झाला आहे. या वाढीव सदस्यसंख्येचा फायदा पालिकेतील सर्वच राजकीय पक्ष आणि नवनिर्वाचित सदस्यांद्वारे स्थापन होणाऱ्या गटांना होणार आहे.पहिल्या बैठकीचा क्रम निश्चित करण्यात आला आहे. यात सर्वप्रथम महापौर आणि उपमहापौरांची निवडणूक होईल, त्यानंतर स्वीकृत नगरसेवकांच्या नावांवर शिक्कामोर्तब केले जाईल आणि शेवटी स्थायी समिती सदस्यांची निवड केली जाईल.



अमरावती मनपाची लोकनिर्वाचित सदस्य संख्या ८७ आहे. या संख्येच्या दहा टक्के म्हणजे ८.७ सदस्य होतात. नियमानुसार, अपूर्णांकातील संख्या नजीकच्या पूर्णांकात गृहीत धरली जाते, त्यामुळे पालिकेत नऊ स्वीकृत नगरसेवक निवडले जातील.स्थायी समितीचे १६ सदस्य निवडण्याचा विषय हा स्वीकृत सदस्यांच्या निवडीनंतरचा असतो. या निवडीसाठी मनपा सभागृहातील पक्ष आणि अपक्ष नगरसेवकांनी स्थापन केलेल्या गटांतील सदस्यांची संख्या विचारात घेतली जाते. कायद्यानुसार, प्रत्येक गटाला त्यांच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाते.नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भाजप २५ नगरसेवकांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. काँग्रेस आणि युवा स्वाभिमान पक्षाकडे (वायएसपी) प्रत्येकी १५ नगरसेवक आहेत. एमआयएमकडे १२, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) कडे ११ नगरसेवक आहेत.शिवसेना (शिंदे गट) आणि बहुजन समाज पार्टीकडे प्रत्येकी ३ नगरसेवक आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडे दोन, तर युनायटेड फोरममध्ये सहभागी असलेल्या वंचित बहुजन आघाडीकडे एक नगरसेवक आहे. विविध समित्यांवर प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी या पक्षांना किंवा अपक्षांना संयुक्त गट स्थापन करणे आवश्यक आहे.अमरावती मनपाच्या स्थायी समितीची सदस्य संख्या १६ आहे, तर शिक्षण, विधी, शहर सुधारणा आणि महिला व बालविकास यांसारख्या इतर सर्व समित्यांमध्ये प्रत्येकी ९ सदस्य असतात.

# बाबा सिद्दिकी सारखीच तुमची हत्या करू

## ... राणांना जीवे मारण्याची धमकी

### पोलिसांत तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती–** भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. बाबा सिद्दिकी सारखीच नवनीत राणा यांची हत्या करू असा फोन पोलिसांना ११२ नंबरवर आला होता. या संदर्भात नवनीत राणा यांचे खासगी स्वीय सहाय्यक सचिन सोनोने यांनी राजापेठ पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध राजापेठ पोलिसांमध्ये गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी, पुढील तपास सुरू आहे.

नवनीत राणा यांना यापूर्वीही अशा धमक्यांचा सामना करावा लागला होता. काही महिन्यांपूर्वी, हैदराबाद येथे झालेल्या निवडणूक प्रचारादरम्यान राणा यांना एका फोनवरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्याचप्रकारे, हिंदू शेरणी या टायटलसाठी ओळखल्या जाणाऱ्या नवनीत राणा यांना पुन्हा एकदा अशा धमकीचा सामना करावा लागला आहे.या घटनेनंतर, पोलिसांनी तत्काळ कार्यवाही सुरू केली आहे. नवनीत राणा यांच्या



खासगी सहाय्यक सचिन सोनोने यांनी राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने फोनवरून राणा यांना जीवे मारण्याची धमकी दिली असून, त्याची चौकशी सुरू आहे.

महापालिका निवडणुकीनंतर राजकीय वातावरण आणखी ताणलेले आहे. अमरावती महापालिका निवडणुकीत भाजप आणि आमदार रवि राणा यांच्या पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. निवडणुकीत मिळालेल्या या यशानंतर राणा दाम्पत्याने विजयाचा जल्लोष केला, मात्र, या यशावर काही तर्कशास्त्रांची चर्चा देखील झाली.विशेषतः, एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्या कडून नवनीत राणा यांच्यावर टीका करण्यात आली होती. ओवैसी यांनी नवनीत राणा यांचे मुलांना जन्म देण्यासंदर्भातील वक्तव्य हसत हसत उपस्थित केले होते. या चर्चेने उचललेली ठिणगी आता एका नव्या वादात बदलली आहे, ज्यात नवनीत राणा यांना धमकी दिली गेली आहे.

नवनीत राणा यांना जीवे मारण्याच्या धमकीचा या आधी नव्हेच नव्हे, नोव्हेंबर महिन्यातही एक पत्राद्वारे असा धाकदायक संदेश आला होता. त्यात, एका अब्दुल नावाच्या व्यक्तीने तिला खूप अश्लील शब्दांमध्ये धमकी दिली होती. या पत्राद्वारे धमकी देण्यात आल्यानंतर, राणा यांच्या सहाय्यकाने पोलिसांकडे तक्रार केली होती आणि त्या वेळी देखील पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.या सर्व घडामोडींमुळे अमरावतीतील राजकीय वातावरण अधिकच ताणले गेले आहे. भाजप नेत्या नवनीत राणा यांना अशी धमकी का दिली जात आहे, याबाबत अनेक तर्क वर्तवले जात आहेत. पोलिसांनी या प्रकरणी जोखीम घेतली असून, अज्ञात व्यक्तीला पकडण्यासाठी विविध पातळ्यांवर तपास सुरू आहे.सध्या पोलिसांचे कार्यवाही सुरू असताना, नवनीत राणा यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणाच्या तपासात कोणत्याही थांबण्याची किंवा विलंबाची वेळ दिली जाणार नाही, असे पोलिसांनी सांगितले आहे.

# अंजनगावसुर्जी नगरपालिकेत अधिकारी कर्मचारी लेटलतीफ

## नगराध्यक्षांनी पदभार स्विकारताच कर्मचाऱ्यांची केली कानउघडणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अंजनगाव सुर्जी**

अंजनगावसुर्जी नगरपालिका नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कार्यालयीन ९-४५ ला वेळेत हजर होऊन कर्मचाऱ्यांचे हजेरी रजिस्टर आपल्या ताब्यात घेऊन तपासले असता १३२ कर्मचाऱ्यांपैकी केवळ चार ते पाच कर्मचारी हजर दिसले त्यांनी याबाबत प्रसासनिक कारभाराबाबत रोष व्यक्त करत उशिरा येणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची चांगलीच कानउघडणी केली व यापुढे असा लेट लतीफ पणा झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल अश्या सूचना अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या यावेळी पालिका कार्यालयात धास्तीचे वातावरण निर्माण झाले होते.स्थानिक नगरपालिका कार्यालयात १३२ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची संख्या आहेत. शासकीय कार्यालयीन वेळ ९:४५ असून आठवड्यातील पहिल्या दिवशी सोमवारी (ता. १९) नियमित वेळेत केवळ पाच कर्मचारी हजर दिसले व ११ वाजेपर्यंत १९ कर्मचाऱ्यासह अधिकारी कार्यालयात उपस्थित होते तर उर्वरित कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसल्याने नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी कर्मचाऱ्यांच्या उशिरा येणाऱ्या सवयी बद्दल नाराजी व्यक्त केली असून प्रशासकीय अधिकाऱ्यांना उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेखी समज देण्याच्या सूचना दिल्या नगरपालिका कार्यालयातील अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याच्या सूचना दिल्या अधिकारी मुख्यालयी हजर राहत नसेल तर त्या अधिकाऱ्याचे घर भाडे भत्ता रद्द करण्यात येईल अशा सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.शहरातील एकूण किती घरकुल बांधकाम झाले व निधी अभावी रखलेले किती लाभार्थी आहेत याबाबत घरकुल विभाग प्रमुखांची चर्चा केली.शहरातील प्रमुख रस्ता असलेला टाकरखेडा नाका ते काठीपुरा या रस्त्यांचे तात्काळ लेवल लाऊन दुरुस्ती करण्याच्या सूचना बांधकाम विभाला देण्यात आल्या आहेत तसेच शहरातील एका महिन्याच्या आत खड्डे मुक्त करण्याच्या सूचना नगराध्यक्षांनी बांधकाम विभाग प्रमुखांना दिल्या आहेत.शहरातील अनेक घरकुल लाभार्थ्यांचे निधी अभावी बांधकाम रखलेले आहेत त्याबाबत माहिती घेऊन निधी बाबत पाठपुरावा करण्याच्या सूचना नगराध्यक्षांनी घरकुल विभाग प्रमुखांना दिल्या शिवाय अग्निशमन विभागातील प्रमुख अधिकारी हे उशिरा कार्यालयात येत असल्याने त्यांची चांगलीच कान उघडणी केली व यापुढे असे चालणार नाही अश्या सूचना दिल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारल्या नंतर आज प्रथमच कार्यालयीन वेळेत हजर होऊन सर्व विभागातील कार्यालयीन माहिती जाणून घेतली यावेळी कार्यालयीन अधीक्षक सुनील उमक, करनिरिक्षक गजानन चक्रणारायन उपस्थित होते.



# वसुंधरा अभियान – ३ मध्ये वरुड नगर परिषदेला मिळाले विभागात पहिले बक्षीस

## तब्बल दीड कोटी रुपयांचा निधीही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०वरुड–** माझी वसुंधरा अभियान थ्री अंतर्गत वरुड नगरपरिषदेला अर्थात वरुडच्या नागरिकांना प्रोत्साहनपर संवर्गात अमरावती विभागातून प्रथम बक्षिस मिळाले आहे. राज्य शासनाद्वारे घेण्यात आलेल्या माझी वसुंधरा अभियान ३ या राज्यस्तरीय स्पर्धेचा निकाल पर्यावरण दिनी घोषित करण्यात आला. त्यानंतर हे यश सर्व नागरिकांना माहित झाले. या बक्षीसापोटी नगर परिषदेला दीड कोटी रुपयांचा विकास निधी मिळाला आहे.



‘माझी वसुंधरा ३’ अभियान हे पंचतत्वावर आधारित होते. पृथ्वी, जल, वायु, अग्नी आणि आकाश अशा पाचही घटकात उत्तम काम केल्यामुळे वरुड नगर परिषदेने अमरावती विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला. ‘माझी वसुंधरा अभियान ३’ हे राज्यात १ एप्रिल ते ३१ मार्च २०२३ या काळात राबवले गेले. अर्थात गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यातील ४११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी यामध्ये सहभाग घेतला होता. वरुड शहरात वृक्ष लागवड, हरित क्षेत्राचा विकास आणि विविध घटकांच्या विकासाची बरीच कामे झाली आहेत. या कामांमुळेच सदर स्पर्धेत नगर परिषदेने अमरावती विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

याबाबत प्रतिक्रिया देताना नगर परीषदेचे प्रशासाक तथा मुख्याधिकारी प्रवीण मानकर यांनी विभागीय आयुक्त तसेच विभागीय पातळीवरील इतर अधिकाऱ्यांची चमू, जिल्हाधिकारी व जिल्हास्तरावरील अधिकारी, नोडल अधिकारी रणजित बिसेन, शहर समन्वयक श्रीपाद भगत, कर निरीक्षक तथा प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, संगणक अभियंता विनय मालधुरे, आरोग्य विभाग प्रमुख बबलु नरहरे तसेच त्या विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सफाई कर्मचारी आणि समस्त वरुडवासियांप्रती मनपुर्वक आभार व्यक्त केले.

# जि.प. पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थान, दालनांच्या दुरुस्तीसाठी ६० लाखांची तरतूद

## नव्या पदाधिकाऱ्यांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लक्षात घेता, अमरावती जिल्हा परिषद प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी ५० लाख रुपये, तर मुख्यालयातील दालनांच्या दुरुस्तीसाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



मार्च २०२२ मध्ये तत्कालीन पदाधिकारी आणि सदस्यांचा कार्यकाळ संपल्यापासून सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये प्रशासक राजवट सुरू आहे. निवडणुका कधी होतील, हे अनिश्चित असल्याने गेल्या तीन वर्षांपासून पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थाने आणि दालनांच्या दुरुस्तीसाठीची वार्षिक तरतूद पुढे ढकलली जात होती. आता निवडणुका अपेक्षित असल्याने जिल्हा परिषद कर्मचारी वसाहतीमधील निवासस्थाने आणि मुख्यालयातील दालनांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेत अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती असे एकूण सहा पदाधिकारी असतात. अध्यक्षांकडे आमसभा, स्थायी समिती आणि जल व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद असते, तर उपाध्यक्षांकडे दोन समित्यांचे सभापतीपद असते. याशिवाय महिला व बालविकास आणि समाजकल्याण समितीसाठी स्वतंत्र सभापती असतात, तर शिक्षण, आरोग्य, वित्त व बांधकाम यापैकी प्रत्येकी दोन खाती अन्य दोन सभापतींकडे दिली जातात. या सर्व पदाधिकाऱ्यांसाठी शासनातर्फे निवासस्थाने आणि कार्यालये उपलब्ध करून दिली जातात, ज्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारीही शासनाची असते.

पदाधिकाऱ्यांना जिल्हाभर प्रवासासाठी सरकारी किंवा खासगी वाहन वापरण्याची मुभा असते. खासगी वाहन वापरल्यास जिल्हा परिषद प्रशासनातर्फे इंधन भत्ता दिला जातो. मात्र, हा भत्ता पुरेसा नसल्याने बहुतांश पदाधिकारी सरकारी वाहनांचीच मागणी करतात. त्यामुळे या वाहनांसाठी लागणारे इंधन आणि चालकाची सोय देखील प्रशासनातर्फेच केली जाते.


# तिवस्यात युरियाचा काळाबाजार थांबवा

## प्रहारचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०तिवसा**

रब्बी हंगाम ऐन भरात असताना



तिवसा तालुक्यातील शेतकरी आज दोन आघाड्यांवर झुंज देत आहे. एकीकडे पिकांना जीवदान देणारा युरिया मिळत नाही, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेले कृषी कार्यालयच वेळेवर उघडत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड संतापाची भावना निर्माण झाली आहे.

तालुक्यात अनेक कृषिसेवा केंद्रांवर युरियाची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना इतर खत, औषधे व महागड्या वस्तू सक्तीने खरेदी करण्यास भागपाडले जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. युरिया हवा असेल तर बाकी सामान घ्यावेच लागेल, अशी अट घालण्यात येत असल्याने गरज नसलेल्या वस्तूंवरही शेतकऱ्यांचा पैसा खर्च होत आहे. आधीच सोयाबीनच्या नुकसानीने मोडीत निघालेला शेतकरी आता या सक्तीच्या विक्रीमुळे अधिकच कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी, इकडून तिकडून उसनवारी करून रबीचे पीक उभे केले. पिकातून थोडाफार पैसा हातात येईल, हीच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. मात्र युरियाच्या काळाबाजारामुळे आणि कृषिसेवा केंद्रांच्या मनमानीमुळे शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फेरले जात आहे. या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संजय देशमुख, सुरेंद्र भिवगडे व मनोज काळमेघ यांनी तिवसा कृषी कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली. मात्र कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ वाजता असताना १२.३० वाजेपर्यंत तालुका कृषी अधिकारी वगळता एकही कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे चित्र दिसून आले.

### तक्रार करा कारवाई करू

युरियाच्या विक्रीबाबत कोणत्याही प्रकारची सक्ती अथवा अनधिकृत विक्री होऊ नये, यासाठी तालुका कृषी कार्यालयाकडून संबंधित कृषी सेवकांना स्पष्ट सूचना देणारा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार असल्यास त्यांनी थेट कार्यालयात लेखी तक्रार करावी. प्राप्त तक्रारींची तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात येईल. कार्यालयीन व शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने काही कर्मचारी बाहेर पाठविण्यात आले होते. त्यामुळे कार्यालयात कर्मचारी संख्या कमी होती.

– हेमलता इंगळे, तालुका कृषी अधिकारी, तिवसा.

# मुरूम तस्करीच्या कारणावरून अपघाताचा कट रचून अजय ने घेतला निलेशचा बळी

## चांदूर बाजार तालुका हादरला, हत्याचा गुन्हा दाखल

### चांदुर बाजार पोलीस स्टेशन परिसरात काही काळ मोठा जमाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०चांदुर बाजार**

चांदुर बाजार पोलीस स्टेशन हद्दीत सोमवार रोजी अपघाताचा कट रचून झालेल्या हत्याकांड मुळे संपूर्ण चांदूर बाजार तालुका हादरुन गेला आहे मुरूम तस्करीच्या कारणावरून आरोपी अजय भुजंगराव लंगोटे यांने तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी येथिल नामांकित गौनखनिज व्यवसायक निलेश बदुकले यांचा अपघाताचा कट रचून हत्या केल्याचा आरोप मृतकाचे वडील फिर्यादी सुरेश बदुकले यांनी केला आहे मृतक निलेश बदुकले व त्यांच्या पत्नी सह वलगाव–अमरावती मार्गावर मॉर्निंग वाक करत असतांना अचानक आरोपी अजय लंगोटे याने मृतक निलेश बदुकले यांना निशाणा बनवत मागून येऊन चार चाकी थेट अंगावर चढवली त्यामुळे मृतकाच्या पत्नीला दुखापत झाली व मृतक निलेश बदुकले यांचा डोक्याला गंभीर दुखापत



झाली त्यामुळे निलेशचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे आरोपी अजय लंगोटे याच्यावर हत्तेचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यासाठी मोठा जमाव पोलीस स्टेशन परिसरात झाला होता तर गुन्हा दाखल न केल्यास थेट मृतदेह पोलीस ठाण्यात आणू असा इशारा मृतकाचे नातेवाईक व ब्राम्हणवाडा थडी येथिल ग्रामस्थांनी दिला असता तणावाचे वातावरण निर्माण झाले होते याची दखल घेत चांदूर बाजार पोलीसांनी आरोपीवर हत्तेचा गुन्हा दाखल करून आरोपी अजयला तात्काळ अटक करण्यात आले महिती नुसार गेल्या अनेक वर्षांपासून मृतक निलेश व आरोपी यांचात गौनखनिज व्यवसायाच्या कारणावरुन वाद होत असल्याच बोलल्या जात आहे तर आरोपी अजय ने अपघाताचा कट रचवत मृतक निलेश बदुकले यांना संपवून पुरावे नष्ट करण्यासाठी प्लॅन बनवला असल्याच बोलल्या जात आहे वाहन क्रमांक एम एच २७ बी क्स ०४२१ मालवाहक चारचाकी हत्याकांड मध्ये वापरण्यात आली असून चांदूर बाजार पोलिसांनी सदर चारचाकी ताब्यात घेतली असून आरोपी अजय भुजंगराव लंगोटे याच्यावर अ.प्र २५/२०२ कलम १०३(१), २८१, १२५ (अ) भा. न्या. स सह कलम १८७ मो.वा. का. गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अजय ला पोलिसांनी अटक केले आहे यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार, ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे व गेल्या काही काळ वरिष्ठ पोलिस अधिकारी चांदूर बाजार पोलीस स्टेशन मध्ये तळ ठोकून होते व दंगा नियंत्रण पथकाची एक तुकडी यावेळी पोलीस स्टेशन परिसरात तैनात करण्यात आली होती.

# राज्याच्या सर्व भागासाठी वैविध्यपूर्ण क्षेत्रात गुंतवणूक येणार- CM देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक एकोसिस्टम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र हे भारतात येणाऱ्या गुंतवणुकीसाठी गेटवे




ऑफ इंडिया आहे. त्यामुळे भारतातील अन्य राज्यांशी आमची चांगल्या अर्थाने स्पर्धा आहे. सरतेशेवटी देशासाठी ही बाब चांगलीच ठरते. पण यातही महाराष्ट्र पुढे आहे याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह प्रतिनिधीमंडळासमवेत दावोस येथे दाखल झाले आहेत. या दरम्यान त्यांनी आज महाराष्ट्र पॅव्हेलीयनमध्ये माध्यमांशी संवाद साधला.महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे फडणवीस म्हणाले.

### वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम गुंतवणूकदारांसाठी चावडी

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची वार्षिक बैठक ही उद्योग, गुंतवणूकदारासाठी एक प्रकारे चावडी आहे. याठिकाणी दरवर्षी आम्ही महाराष्ट्राकडे काय आहे, कोणती क्षमता आहे, हे शोकेस करण्यासाठी येत असतो. यंदाही गतवर्षीच्या तुलनेत आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास आहे. कारण देशात अशा प्रकारे येणारी गुंतवणूक व त्याबाबतचे करार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अशाप्रकारे सुमारे ६० ते ६५ करार प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्राला यश मिळाले आहे. दावोस परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहेच. इथे उद्योगजगत एकत्र येतो. महाराष्ट्रातून आलेल्या उद्योजकांनी या मंचाचा पुरेपूर उपयोग करावा, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

# मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही

## राज ठाकरेंच्या नगरसेवकाने थोपटले दंड

### यशवंत किल्लेदारांचे थेट सरकारला आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मुंबई-** यंदाच्या मुंबई महापालिका निवडणुकीत 'मराठी अस्मिता' आणि 'परप्रांतीय' हे मुद्दे केंद्रस्थानी राहिल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या लढतीकडे लागले होते. ठाकरे बंधू एकत्र आल्याने मराठी मतांच्या ध्रुवीकरणासाठी प्रयत्न झाले, तर राज ठाकरे यांनी मुंबई गुजरातला नेण्याच्या शक्यतेवरून आक्रमक भूमिका घेत जोरदार प्रचार केला होता. मात्र, मराठी माणूस विरुद्ध परप्रांतीय अशा रंगलेल्या या अटीतटीच्या सामन्यात ठाकरे बंधूंना मुंबईची सत्ता राखण्यात अपयश आले. भारतीय जनता पक्ष सर्वाधिक



जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला असून, त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवत आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

एकीकडे भाजपने मुंबईत विजय मिळवलेला असतानाच, आता बिहारमधील नितीश कुमार सरकारने मुंबईत 'बिहार भवन' उभारण्याची घोषणा केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या प्रस्तावावर अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, मुंबईत बिहार भवन कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा इशारा मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवका यशवंत किल्लेदार यांनी दिला आहे.

यशवंत किल्लेदार म्हणाले, आम्ही मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही. महागाई वाढली आहे, या गोष्टीकडे लक्ष द्यायचे सोडून नको त्या गोष्टीत पैसे घालवतात. मुंबईत बिहार भवन बांधण्यापेक्षा बिहारमध्येच तुम्ही खर्च करा ना, इथे आमचे प्रश्न सुटत नाहीत, तुम्ही तुमचे प्रश्न सोडवा, असे किल्लेदार यांनी म्हटले आहे. तसेच निवडून आलेले नगरसेवक हे कट्टर आहेत, जे गद्दार आहेत ते आधीच निघून गेले आहेत. त्यामुळे ऑपरेशन टायगर वगैरे सगळे फेल आहे, असे म्हणत कुठलाही नगरसेवक फुटणार नसल्याचे किल्लेदार यांनी स्पष्ट केले आहे.

# बहिरम यात्रेत दारूचा महापूर उत्पादन शुल्क व पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०ब्राह्मणवाडा थडी**

विदर्भात प्रसिद्ध असलेल्या बहिरम यात्रेत यंदा श्रद्धेपेक्षा अवैध दारूचाच बोलबाला अधिक दिसून येत आहे. यात्रेच्या परिसरात खुलेआम दारू विक्री सुरू असून, रोज सरासरी दोन हजारांहून अधिक बॉटल्स विकल्या जात असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. विशेषतः रविवारी तर विक्रमी प्रमाणात दारूची विक्री झाल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगत आहे.

अधिक गंभीर बाब म्हणजे या अवैध धंद्यात महिला तसेच अल्पवयीन मुलींचा थेट सहभाग असल्याने पोलिस व उत्पादन शुल्क विभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. यात्रेच्या गजबजलेल्या ठिकाणी, काही चहाच्या टपऱ्यांआड, तंबूमध्ये व मटण हॉटेल, मटण दुकानात, काही पान ठेल्यावर तर रस्त्यालगत उघडपणे दारू विकली जात असूनही उत्पादन शुल्क विभाग व पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

बहीरम यात्रेत पोलिसांकडून दारू विक्री करणाऱ्या वर कारवाई होताना दिसत नसल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दारूच्या महापुरामुळे यात्रेतील वातावरण बिघडले असून, हाणामाऱ्या, शिवीगाळ, छेडछाड व अपघातांचे प्रमाण वाढले आहे. कुटुंबासह आलेल्या भाविकांना भीतीच्या छायेत यात्रा करावी लागत आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, अल्पवयीन मुलींना या अवैध व्यवसायात ढकलले जात असल्याने सामाजिक आरोग्यालाच धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, पोलिसांची गस्त



केवळ कागदावरच असून, प्रत्यक्षात अवैध विक्रीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईची नोंद केवळ औपचारिक ठरतेय, असा रोष नागरिक व्यक्त करीत आहेत. कारवाई नेमकी कोणासाठी थांबवली आहे ? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. अवैध विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, अल्पवयीनांच्या सहभागाची चौकशी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी केली आहे.यात्रेला अवैध दारूचे ग्रहण लागणार की प्रशासन जागे होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गुन्हे शाखा, स्थानिक पोलिस, उत्पादन शुल्क विभाग लुप्त ?

बहिरम यात्रेत इतक्या मोठ्याप्रमाणावर अवैध दारू विक्री होत असतांना स्थानिक पोलिस अपेक्षेप्रमाणे मौन आहेत . परंतु गुन्हे शाखा, राज्य उत्पादन शुल्क मौन का हा प्रश्न पडला आहे. दोन्ही विभागासह स्थानिक पोलिस हा विभागाच्या बहिरम यात्रेत ठाण मांडून असला तरी कारवाई कुठे ? असा प्रश्न आपसूकच उपस्थित होत आहे. आर्थिक व्यवहारामुळे तर कारवाई होत नाही असा संशय बळावत आहे. त्यात एक पोलिस कर्मचारी सर्वांच्या संपर्कात आहे. तर बिट सोडून बहिरम मध्ये ठाण मांडून असल्याची चर्चा जोमात असताना कारवाई होत नसल्याने ती चर्चा खरी ठरली आहे.-

# मुऱ्हा येथील जगदंबा माता मंदिरात धाडसी चोरी!

### चांदीचा मुकुट व दानपेटी लंपास;परिसरात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अंजनगाव सुर्जी**



अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मुऱ्हा येथे असलेल्या जगदंबा माता मंदिर व झिंगराजी महाराज संस्थान येथे अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना समोर आली असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.रविवारी मध्यरात्री सुमारे अडीचच्या सुमारास चोरट्यांनी मंदिरातील देवीचा चांदीचा मुकुट तसेच बाहेर ठेवलेली दानपेटी फोडून लंपास केली.आज सकाळी मंदिर उघडल्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास येताच नागरिकांनी तात्काळ रहिमापूर पोलीस स्टेशनला माहिती दिली.माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले.परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता,दोन संशयित इसम तोंडाला मास्क व जॅकेट परिधान केलेल्या अवस्थेत दिसून आले आहेत.या घटनेनंतर मुऱ्हा गावात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या चोरीमध्ये दानपेटीतील रोख रक्कम तसेच देवीचा मौल्यवान चांदीचा मुकुट चोरीला गेल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.याबाबत माहिती देताना जगदंबा माता व झिंगराजी महाराज संस्थानचे अध्यक्ष साहेबराव पाटील पखान यांनी घटनेची पुष्टी केली.घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे,रहिमापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अनंत वडतकर,अंजनगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर,सहाय्यक पोलीस अधिकारी गजानन सोनवणे,गजानन वर्मा तसेच अंजनगाव डीबी स्कॉड कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की,स्पेशल बॉक्स पथक तसेच अमरावती येथून एक्सप्रेस टीम तपासासाठी दाखल होणार असून लवकरच या चोरीचा छडा लावण्यात येईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# काँग्रेसची ओबीसी बहुजन आघाडीसोबत युती: वारे कोणत्या दिशेने वाहतेय ते लक्षात घ्या

## हर्षवर्धन सपकाळांचा सरकारला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मुंबई -** नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीसोबत केलेल्या युतीला मोठे यश मिळाले असून, या आघाडीने लातूर महापालिकेवर आपले वर्चस्व निर्माण केले आहे.

राज्यातील इतर विविध महापालिका निवडणुकांमध्येही या प्रयोगाला मतदारांनी मोठ्या प्रमाणात पसंती दिल्याचे दिसून आले. महापालिकांमधील या घवघवीत यशानंतर काँग्रेसने आता आपला विस्तार वाढवण्यावर भर दिला असून, आगामी निवडणुकांसाठी मित्रपक्षांची मोट बांधण्यास सुरुवात केली आहे.

याच रणनीतीचा भाग म्हणून आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी काँग्रेसने आता 'ओबीसी बहुजन आघाडी'सोबत अधिकृतपणे युतीची घोषणा केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि ओबीसी नेते प्रकाश शेंडगे, चंद्रकांत बावकर व जे. डी. तांडेल यांच्यात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला काँग्रेसचे



विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील हे ऑनलाईन उपस्थित होते. या नव्या समीकरणामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राजकीय चुरस अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, ओबीसींचा केलेला विश्वासघात लक्षात आल्यानंतर आता ओबीसी काँग्रेस सोबत येत आहे. वारे कोणत्या दिशेने वाहत आहे ते लक्षात घ्या, असा इशारा त्यांनी दिला. तसेच हा आमचा संघर्षाचा काळ असून वैचारिक पातळीवर आम्ही एकत्रित आलो आहोत, असे सपकाळ म्हणाले.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हॉटेल पॉलिटिक्सवर देखील टीका केली. ते म्हणाले, हॉटेल पॉलिटिक्स त्यांची राजकीय शैली असेल.

मात्र, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत सदस्यांना सुद्धा हॉटेलमध्ये ते घेऊन जाणार का? लोकशाहीवर विश्वास नाही का? असा सवाल सपकाळ यांनी केला. तसेच एकनाथ शिंदे यांच्याकडून भाकरी फिरवण्याची शक्यता नसल्याचे सपकाळ म्हणाले.

**समविचारी पक्षांसोबत आम्ही जात आहोत- प्रकाश शेंडगे**

काँग्रेस आणि ओबीसी बहुजन आघाडी यांच्यात युती झाल्यानंतर प्रकाश शेंडगे म्हणाले, शासन निर्णय काढून ओबीसींच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत. २७% आरक्षण ओबीसींना मिळाले. मात्र, त्यावर घाला घालण्याचे काम केले जात आहे.

कुणबी दाखले देण्याचे काम केले जात आहे. ओबीसी बहुजन आघाडी आता पक्ष निर्माण झाला असून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लढवण्याचा आम्ही ठरवले आहे. समविचारी पक्षांसोबत आम्ही जात आहोत. आरक्षणाचा मुद्दा असेल, आमचे प्रश्न असतील, यावर आवाज उठवण्याचे काम राहुल गांधी यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितलं.

## अमरावतीचे पहिले 'वीरचक्र' विजेते एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र देशपांडे यांचे निधन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती**




भारतीय हवाई दलातील शौर्याचे प्रतीक आणि अमरावती जिल्ह्याचे पहिले 'वीरचक्र' सन्मानित सुपुत्र, निवृत्त एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र नरेश देशपांडे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाने एक महान योद्धा गमावला आहे. मूळचे अमरावतीचे, दर्यापूर तालुक्यातील वडनेरगंगाई गावचे रहिवासी शरदचंद्र देशपांडे यांनी भारतीय हवाई दलात फ्लाइट लेफ्टनंट असताना १९६५ मध्ये पश्चिमी क्षेत्रात आपल्या प्राणांची बाजी लावून अतुलनीय शौर्य गाजवले होते. त्यांच्या या साहसाबद्दल केंद्र सरकारने त्यांना'वीरचक्र' या सैन्यदलातील प्रतिष्ठित सन्मानाने गौरविले होते. त्यांच्या या यशाची दखल घेऊन अमरावती रेल्वे स्थानकावर त्यांच्या सन्मानार्थ एक गौरवशिला (मानपत्र) देखील लावण्यात आली आहे.देशपांडे यांचे बालपण आणि सुरुवातीचे शिक्षण अमरावतीत झाले. ते हवाई दलात उच्च पदावर कार्यरत असतानाही त्यांचे आपल्या मातीशी नाते कायम होते. निवृत्तीनंतर ते पुण्यात स्थायिक झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.अमरावती रेल्वे स्थानकावर गौरवशिला आजही अमरावती रेल्वे स्थानकावर त्यांच्या सन्मानार्थ लावलेली गौरवशिला येणार्या जाणार्या प्रवाशांना प्रेरणा देत असते. रेल्वे मंत्रालयाने उभारलेल्या या शिलेवर त्यांच्या शौर्याची गाथा हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा तीनही भाषांत कोरलेली आहे. एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र देशपांडे यांच्या निधनाबद्दल अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्रातून हळहळ व्यक्त केली जात असून, त्यांच्या शौर्याला देश सदैव स्मरणात ठेवेल.

# सातपुडा भागातील मेळघाटी म्हशीला राष्ट्रीय मानांकन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मेळघाट :** देशात दुधाच्च्या वाढत्या मागणी सोबतच उत्पादनात देखील भरीव वाढ होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने अधिक उत्पादन देणाऱ्या पशुंच्या संगोपनाकडे दूध उत्पादकांचा भर असतो. भरीव उत्पादन देणाऱ्या गाई-म्हशीच्या जातीच्या शोधात उत्पादक असतात. त्यांच्यासाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे.



सातपुडा पर्वत रांगेतील दुर्गम भागात संगोपन होत असलेल्या मेळघाटी म्हशीला राष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले. अधिक स्निग्धांश युक्त दूध देण्याची या म्हशीची क्षमता असून उत्पादन देखील उत्तम असल्याची माहिती पशु वैद्यकीय महाविद्यालयाकडून देण्यात आली.महाराष्ट्रातील नागपुरी, पंढरपुरी, मराठवाडी पूर्णाथडी म्हशींच्या नोंदीकृत जातीसह विदर्भातील स्थानिक मेळघाटी म्हशीला अधिकृत जात म्हणून मान्यता मिळाली. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांना मेळघाटी म्हशीचे नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. अकोल्यातील पशु वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चेतन्य पावशे, प्रकल्प संशोधक डॉ. शैलेंद्र कुरळकर, डॉ. प्रवीण बनकर आणि डॉ. प्राजक्ता कुरळकर यांनी त्यासाठी प्रयत्न केले.आदिवासी आणि गवळी समाजाकडून अनेक पिढ्यांपासून मेळघाटी म्हशीचे संगोपन केले जात आहे. अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा या भागात प्रामुख्याने आढळणारी मेळघाटी म्हशीला पहाडी असे देखील संबोधले जाते. काळा कुळकुळीत रंग, केसाळ कातडी, मध्यम आकाराची वर व आतल्या बाजूने वळणारी वक्राकार शिंगे, सपाट कपाळ, माथा ही प्रमुख बाह्यरूप म्हशीचे आहेत. मेळघाटी म्हशीची उत्पादन आणि पुनरुत्पादन क्षमता उत्तम असून स्थानिक डोंगराळ प्रदेशात चांगल्या प्रकारे जुळवून घेते.

**मेळघाटी म्हशीच्या खव्याला बाजारपेठेत विशेष मागणी**

अधिक स्निग्धांश युक्त दूध देण्याची क्षमता मेळघाटी म्हशीत आहे. दुधातील स्निग्धांशाचे प्रमाण सरासरी सात टक्के असून दुधापासून खवा, तूप असे दुग्धजन्य पदार्थ पशुपालकांकडून बनवले जातात. मेळघाटी म्हशीच्या खव्याला स्थानिक बाजारपेठेत विशेष मागणी असल्याची माहिती अकोल्यातील पशु वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. प्रवीण बनकर यांनी दिली. राष्ट्रीय मानांकन प्राप्त झालेल्या म्हशीच्या या जातीला दूध उत्पादकांकडून अधिक प्रमाणात मागणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# २४ ला 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' विषयावर व्याख्यान

### विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा संयुक्त उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२०अमरावती** ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून डीआरडीओ, पुणेचे सेवानिवृत्त समूह संचालक श्री काशीनाथ देवधर हे 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू व डॉ. विजय नागरे यांची उपस्थिती लाभणार आहे.विद्यापीठाच्यावतीने आयोजित व्याख्यानाला जास्तीतजास्त संख्यने उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकांचे पडघम

# वरुड तालुक्यात इच्छुकांची सर्कलनिहाय धावपळ वाढली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०वरुड

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असतानाच आता वरुड तालुक्यात आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांचे वेध लागले आहेत. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी 'सर्कलप्रेम' दाखवण्यास सुरुवात केल्याचे चित्र तालुक्यात सर्वत्र दिसून येत आहे. प्रत्येक सर्कलमधील गावागावांत भेटी, विविध कार्यक्रमांचे आयोजन, तसेच ग्रामस्थांशी थेट संवाद साधण्यावर इच्छुकांचा भर वाढला आहे.तालुकास्तरावर पंचायत समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा परिषद निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असल्याने इच्छुकांनी पायाला भिंगरी बांधली आहे. अनेक वर्षांपासून राजकीयदृष्ट्या निष्क्रिय झालेले




कार्यकर्ते व नेते पुन्हा सक्रिय झाले असून, आगामी निवडणूक रणसंग्रामासाठी तयारीला लागले आहेत. मागील तीन वर्षांनंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या गट-गणांची निवडणूक होणार असल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे.सोशल मीडियावर प्रचाराचा धुरळाइच्छुकांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, आरोग्य शिबिरे, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल केले जात आहेत. काही कार्यक्रमांवर नागरिकांच्या संमिश्र प्रतिक्रिया देखील सोशल मीडियावर उमटताना दिसत आहेत. प्रचाराचे हे नवे माध्यम इच्छुकांकडून प्रभावीपणे वापरले जात असल्याचे स्पष्ट होत आहे.अमरावती जिल्ह्यात अद्याप निवडणुका जाहीर झाल्या नसल्या तरी येत्या काळात कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तालुक्यातील दहा पंचायत समिती गण आणि पाच जिल्हा परिषद सर्कलमध्ये अनेक इच्छुक पूर्वी फारसे सक्रिय नव्हते. अनेक गावांतील ग्रामस्थांना मूलभूत प्रश्नांसाठी थेट पंचायत समिती व जिल्हा परिषद कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत होते. मात्र आता निवडणुकांचे संकेत मिळताच इच्छुकांचे गावांवरील प्रेम अचानक उफाळून आल्याचे चित्र दिसत आहे.

**आरक्षणाचा फटका प्रस्थापितांना**

पाच जिल्हा परिषद सर्कलपैकी दोन सर्कल आरक्षित झाल्याने अनेक प्रस्थापित नेत्यांच्या राजकीय मनसुब्यांवर पाणी फेरले आहे. बेनोडा व पुसला सर्कल अनुसूचित जमातीसाठी, तर जरूड नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारणसाठी राखीव झाला आहे. आमनेर सर्कल सर्वसाधारण असल्याने येथे उमेदवारांची मोठी भाऊगर्दी दिसून येत आहे. पुसला आणि बेनोडा सर्कलमध्ये आरक्षणामुळे प्रस्थापितांना मोठा फटका बसल्याची चर्चा आहे.

**गावोगावी कार्यक्रमांना हजेरी**

इच्छुकांनी आपापल्या सर्कल व गणात दौरे सुरू केले असून, साखरपुडे, लग्नसमारंभ, हरिनाम सप्ताह, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांना आवर्जून उपस्थिती लावत आहेत. काही इच्छुकांनी आरोग्य तपासणी शिबिरे, क्रिकेट सामने, कबड्डी स्पर्धा, शंकरपट यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करून मतदारांशी संपर्क वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. यासोबतच गट-गणातील राजकीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती मिळवून शक्तिप्रदर्शन करण्यावरही भर दिला जात आहे.एकूणच, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे पडघम वाजू लागताच वरुड तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून, आगामी काळात ही स्पर्धा आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# नगरसेविकांच्या कामकाजातील हस्तक्षेपाला लगाम

## 'नवरोबाचे राजकारण' खपवून घेतले जाणार नाही

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

नगर परिषद, नगरपालिका तसेच महानगरपालिका निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींच्या कामकाजात त्यांच्या पती, सासरे किंवा जवळच्या नातेवाइकांचा थेट अथवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप झाल्यास संबंधित महिला नगरसेविका, सरपंच किंवा पदाधिकारी अपात्र ठरू शकतात, असा ठाम इशारा राज्य शासनाने दिला आहे. महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा गैरवापर रोखण्यासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे स्वतंत्र नेतृत्व सक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने ही कडक भूमिका घेतली आहे.नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद, नगरपंचायत व महानगरपालिका निवडणुकांनंतर अमरावतीसह राज्यातील अनेक भागांत काही नवनिर्वाचित महिला नगरसेविकांच्या कामकाजात माजी नगरसेवक किंवा राजकीय पदाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाबाबत चर्चा सुरू झाली आहे. काही ठिकाणी महिला प्रतिनिधी या केवळ नावापुरत्या असून प्रत्यक्ष निर्णय प्रक्रिया त्यांच्या पती किंवा कुटुंबातील सदस्यांकडून चालवली जात असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट केले आहे की,



अशा प्रकारचा हस्तक्षेप आढळल्यास संबंधित महिला लोकप्रतिनिधींचे पद धोक्यात येऊ शकते.स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठी लागू असलेल्या आरक्षणाचा मूळ हेतू महिलांचे राजकीय सक्षमीकरण, नेतृत्व विकास आणि निर्णयस्वातंत्र्य अबाधित ठेवणे हाच आहे. मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी महिला आरक्षणाचा वापर कुटुंबातील पुरुष सदस्यांना अप्रत्यक्ष सत्ता मिळवण्यासाठी केला जात असल्याचे चित्र दिसते. प्रभाग महिला आरक्षित झाल्यानंतर काही माजी नगरसेवक किंवा इच्छुक उमेदवारांनी आपल्या पत्नी, सून किंवा जवळच्या नातेवाइकांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले, अशी उदाहरणे समोर आली आहेत.राज्य सरकारच्या धोरणानुसार महिला लोकप्रतिनिधींनी विकासकामांबाबतचे निर्णय स्वतः घेणे, सभांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे आणि प्रशासनाशी थेट संवाद साधणे अपेक्षित आहे. केवळ निवडणूक जिंकणे नव्हे, तर लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडणे, जनतेच्या प्रश्नांना न्याय देणे आणि प्रशासकीय नियंत्रण ठेवणे हे महत्त्वाचे आहे.या कडक कायदेशीर तरतुदी केवळ कागदावर न राहता त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. महिलांचे प्रतिनिधित्व केवळ औपचारिक न राहता प्रत्यक्ष सत्तेत रूपांतरित व्हावे, यासाठी शासनाचा हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांतील कामकाजावर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याचे संकेतही यानिमित्ताने मिळत आहेत.

# विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेत हस्तापूरचे 'सार्थक भजन मंडळ' प्रथम



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०चिखलदरा

चिखलदरा तालुक्यातील वस्तापूर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत भव्य विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने गुरुदेव सेवा भजन मंडळाच्या वतीने आयोजित या स्पर्धेत विदर्भातील नामांकित भजन मंडळांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. या स्पर्धेत हस्तापूर येथील सार्थक भजन मंडळाने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला.भजन स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील अनुभवी व नवोदित भजन मंडळांनी गुरुदेवांच्या विचारांवर आधारित अभंग, भजन व कीर्तन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. खंजिरीच्या ठेक्यावर सादर होणाऱ्या भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या स्पर्धेत शिस्तबद्ध सादरीकरण, सूर-ताल, भावार्थ आणि आशय यांचा विचार करून परीक्षकांनी निकाल जाहीर केला.प्रथम क्रमांक पटकावलेल्या हस्तापूर येथील सार्थक भजन मंडळाला मेळघाट विधानसभेचे आमदार केवळराम काले यांच्या हस्ते ११ हजार १४१ रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार स्वीकारताना भजन मंडळातील सदस्यांनी गुरुदेवांच्या विचारांप्रती निष्ठा ठेवून समाजप्रबोधनासाठी कार्य करत राहण्याचा संकल्प व्यक्त केला.या स्पर्धेत द्वितीय क्रमांक राष्ट्रसंत भजन मंडळ, जनुना, तर तृतीय क्रमांक महाराणा भजन मंडळ, यवतमाळ यांनी मिळवला. चतुर्थ क्रमांक गुरुकुंजाचे भजन मंडळ, मोगरी, पाचवा क्रमांक राष्ट्रसंत जन्मस्थान भजन मंडळ, यावली, सहावा क्रमांक गुरुदेव सेवा भजन मंडळ, शेडीक्षेत्र, सातवा क्रमांक गुरुदेव सेवाश्रम भजन मंडळ, यावली, आठवा क्रमांक गुरुदेव सेवा भजन मंडळ, बोरी, नववा क्रमांक श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, उपतखेडा, दहावा क्रमांक श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, आंबाघाटी, तर अकरावा क्रमांक सादगी भजन मंडळ, मोहाडी आणि बारावा क्रमांक बाल भजन मंडळ, आनंदधाम यांनी पटकावला.कार्यक्रमास सरपंच केवल ग्रामरकर, उपसरपंच जनभाऊ देवले, नकुल गायन, सुधीर भावत यांच्यासह परिसरातील भजनी मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भजन मंडळांच्या सादरीकरणादरम्यान उपस्थितांनी टाळ्या व हरिनामाच्या घोषाने दाद दिली.ही विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा केवळ स्पर्धा न राहता गुरुदेव सेवा, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक जतनाचे प्रभावी माध्यम ठरली. अशा उपक्रमांमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# मेळघाटसह वडाळी पोहरा जंगलात पानगळ सुरू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०पोहरा बंदी

निसर्गाची किमयाच न्यारी, अशाच नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या डोंगरदऱ्यांच्या वडाळी आणि चांदूर वन परिक्षेत्रातील जंगलात निसर्गाची अफलातून जादू पाहावयास मिळते. सध्या झाडांच्या पानगळतीला सुरुवात झाली आहे. ही येणाऱ्या ऋतूची जणू चाहूल आहे. ज्यात गळालेल्या पानांच्या जागी नवीन पालवी फुटून झाड ताजेतवाने दिसते.

निसर्गात वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे भारतीय ऋतू निसर्गातील विविध बदलांची नांदी देतात. शिशिर ऋतूने पानगळीला सुरुवात केली आहे. निसर्गाला नवे रूप देणारा हा ऋतू शेती आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जातो. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात असणारा हा ऋतू थंडीचा ऋतू म्हणूनही ओळखला जातो. जंगलात शिशिराची पानगळ सुरु झाली असून, झाडांची पाने पिवळीगर्द होऊन गळण्यास सुरुवात झाली आहे. या गळतीमुळे जंगलात सर्वत्र पालापाचोळा मोठ्या प्रमाणात पसरल्याचे चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्रात दिसन येत आहे.

पानगळ ही नैसर्गिक क्रियाझाडांची पाने गळणे, ही नैसर्गिक बाब असून, ज्या झाडांची पाने रुंद, लांब असतात, अशीच पाने गळतात. या दिवसात झाडांच्या मुळांना पाणीपुरवठा चांगला व्हावा, या हेतूने किया घडते.

**नवीन पालवी फुटणार**

शिशिर ऋतूचे आगमन झाले असून, जंगलात सर्वत्र पालापाचोळा मोठ्या प्रमाणात पसरला आहे. झाडांची मोठी पाने या ऋतूत गळून पडतात व नवीन पाणे येण्यास सुरुवात होते.

# चेक पोस्टवर पोलिस पाटलांची ड्यूटी रद्द करा

## महाराष्ट्र राज्य पोलिस पाटील श्रमिक संघटनेने केली शासनाकडे निवेदनाव्दारे मागणी

विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अचलपूर

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाद्वारे अचलपूर बैतूल व ठोक बरडा चेक पोस्टवर पोलिस पाटलांची ड्यूटी लावण्यात आलेली आहे. सदर पाळीचा आदेश रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पोलिस पाटील श्रमिक संघटनेने केली आहे. यासंदर्भात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले आहे.

तहसीलदार अचलपूर यांनी जारी केलेले बैतूल व ठोक बरद्वा चेक पोस्ट तर प्रत्येक गावच्या पोलीस पाटलांच्या सकाळी ७ ते रात्री ७ आणि रात्री ७ ते सकाळी ७ यावेळेत कामाच्या पाळी लावण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये महिला पौलिस पाटील देखील आहेत. परंतु महाराष्ट्र ग्राम पोलिस अधिनियम

१९६७ अंतर्गत कलम ६ नुसार पोलिस पाटील आपल्या गावातील कार्यक्षेत्रातच काम करू शकतो. आपल्या गावातील कार्यक्षेत्र सोडून बाहेर गावी चेक पोस्ट व पोलिस पाटील कर्तव्य बजावू शकत नाही. आजपर्यंत पोलिस पाटलांना गावाबाहेर कोठेही कार्य करण्याचे आदेश नाहीत. पोलिस पाटील २५ ते ५० किलोमीटर अंतरावरून रात्री बेरात्री एकटा येता जाता पोलिस पाटलांच्या जीवाची हानी झाल्या त्याचे कुटुंबाची जबाबदारी कोण घेणार असा सवाल सुद्धा संघटनेने केला आहे. विशेष म्हणजे वाळूमाफिया जिल्हाधिकारी तहसीलदार यांची गोय करीत नाही तर पोलिस पाटील काय असा खड़ा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे. पोलिस पाटलांना कुठेही कायदेशीर संरक्षण नाही इतर शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या शर्ती व सोयी त्या पण कायदेशीर पोलिस पाटलांना बहाल नाहीत पोलिस पाटलांना भरपूर असे मानधन सुद्धा नाही विमा संरक्षण अनुकंपा अशाच जीवाची हानी झाल्या त्यांचे कुटुंबाचे पालन पोषण कोण करणार असे प्रश्न संघटनेने उपस्थित केले आहे. पोलिस पाटलांच्या पुसला चेक पोस्टवर विशेष म्हणजे वरुड तालुक्यातील लावण्यात आलेल्या पोलिस पाटील पाळीचा आदेश सुद्धा रद्द करण्यात आला होता. तरी प्रशासनाने हा आदेश रद्द करण्याची एकमुखी मागणी पोलिस पाटील संघटनेने केली आहे.

# पुनर्वसित गावांमधील मूलभूत नागरी सुविधासाठी ४ हजार ७७५ कोटी मंजूर

## आ प्रताप अडसड यांचा पाठपुरावा; बेंबळा प्रकल्प अंतर्गत गावांना मिळणार सुविधा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२० धामणगाव रेल्वे

यवतमाळ व अमरावती जिल्ह्यातील बेंबळाप्रकल्प अंतर्गत येणाऱ्या गावात आता सोयी सुविधा मिळणार असूनव सिंचना करिता बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय शनिवार दिनांक १७ जानेवारी २०२६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला. प्रकल्पामुळे चादूर रेल्वे सह पाच तालुक्यातील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या निर्णयामध्ये केवळ मौजा धामकच्या पुनर्वसनापुरतेच मर्यादित न राहता, इतरही सर्व पुनर्वसित गावांतील नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा समावेश करण्यात आला आहे. आ प्रताप अडसड यांनी केलेल्या मागणी व पाठपुराव्याला यश आले आहे सोईसुविधा मध्ये पुनर्वसित गावातील कॉंक्रीट नाल्यांचे बांधकाम, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, ग्रामपंचायत इमारतींची उभारणी, अखंड वीजपुरवठा, स्मशानभूमी शेडची दुरुस्ती, वॉल कंपाऊंड व इतर अनुषंगिक कामे, बसस्थानकासाठी शेड, घरबांधणीसह शौचालय (शौचकूप) व स्थलांतरण अनुदान, कोंडवाडा व हौद, गावासाठी भव्य प्रवेशद्वार, मोठ्या सभागृहाची उभारणी, शासकीय इमारतींना वॉल कंपाऊंड, प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याची वसाहत तसेच गावांना जोडणाऱ्या पोच रस्त्यांसारख्या अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुनर्वसन म्हणजे केवळ स्थलांतर नव्हे, तर नागरिकांना सन्मानाने, सुरक्षित आणि सुविधा-संपन्न जीवन जगता यावे, या भूमिकेतून आमदार प्रताप अडसड यांनी हा विषय सातत्याने शासनदरबारी मांडला. अनेक वर्षांपासून पुनर्वसित गावांतील नागरिकांना मूलभूत सुविधांच्या अभावामुळे भेडसावणाऱ्या अडचणी आता आ अडसड यांच्या प्रयत्नामुळे दूर होणार असून, त्यांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. हा निर्णय पुनर्वसित गावांच्या सर्वांगीण विकासासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण व दिशादर्शक पाऊल ठरणार असून, पायाभूत सुविधा मजबूत होत विकासाला गती मिळेल, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा सक्षम होतील असे मतपुनर्वसित गावातील सरपंच,उपसरपंच यांनी व्यक्त केले आहे.

# वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा कलाविष्कार नृत्य-एकपात्रीने प्रेक्षक मंत्रमुग्ध



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०भातकुली

भातकुली पंचायत समितीअंतर्गत गणोरी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा येथे सोमवार (दि. १९) रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, भारूड, आदिवासी नृत्य, शेतकरी नृत्य, लावणी, बालगीत व लोकगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे उद्घाटन उत्तमसरचे सरपंच धमेंद्र मेहरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रत्नदीप सवाई होते. प्रमुख अतिथी म्हणून हायस्कूलचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, पोलीस पाटील सचिन सवाई, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ. प्रिया मानकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.स्नेहसंमेलनात विविध गीतांवर सादर करण्यात आलेल्या नृत्यांनी रंगत आणली. विशेष आकर्षण ठरले ते कु. शिवराई मालधुरे हिच्या एकपात्री नाट्यप्रयोगाचे. मी सावित्री बोलते या एकपात्रीत तिने प्रभावी संवादफेक व हावभावातून सादरीकरण करत गावकऱ्यांना आश्चर्यचकित केले. लहान वयात असे सशक्त सादरीकरण पाहून उपस्थितांनी तिचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद कांबळे यांनी केले, प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. मिनाक्षी इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन येलोणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे सहकार्य लाभले.

# नांदगाव नगरपंचायत समितीचे सभापती, उपसभापती अविरोध



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०नांदगाव खंडेश्वर

नगरपंचायत विषय समितीच्या निवडणुकीसाठी सोमवारी विशेष सभा घेण्यात आली. यात अर्थ व नियोजन समितीच्या सभापतीपदी उपाध्यक्ष अब्दुल जमीर अब्दुल रहीम, पाणीपुरवठा समितीचे सभापतीपदी वासुदेव लोखंडे, आरोग्य सभापतीपदी जोत्सना धवसे, महिला व बालकल्याण सभापतीपदी कांता लोमटे व उपसभापतीपदी शिला वाडेकर त्यांची निवड करण्यात आली. या सर्व समित्यांमध्ये प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने हे सर्व सभापती बिनविरोध निवडण्यात आले.

बांधकाम या निवडणुकीत समितीच्या सभापतीसाठी दोघांचे अर्ज दाखल झाले होते. यात मोहम्मद रियाज मोहम्मद मुमताज हे तीन मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी वैभव कोंडवते यांना दोन मते मिळाली. यावेळी स्थायी समितीचे गठीत केली. यात नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर या पदसिद्ध अध्यक्ष आहेत. तर सदस्यपदी अ. जमीर अ. रहीम, वासुदेव लोखंडे, जोत्सना धवसे, कांता लोमटे, मोहम्मद रियाज मोहम्मद मुमताज यांची निवड करण्यात आली. या निवडणुकीत पीठासन अधिकारी वरुडचे मुख्याधिकारी गजानन भोयर व सहायक म्हणून नांदगावचे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांनी काम सांभाळले.

# निवडणूक खर्च सादर करण्याची अंतिम मुदत जवळ

## उमेदवारांवर कारवाईची टांगती तलवार



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

महापालिकेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच निवडणूक शाखेने सर्व उमेदवारांना निवडणूक खर्चाचा तपशील विहित नमुन्यात सादर करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. हा खर्च निर्धारित मुदतीत सादर न केल्यास संबंधित उमेदवारांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे अगदी कमी फरकाने पराभूत झालेल्या अनेक उमेदवारांनीही पुढील निवडणुकांमध्ये अडचणी येऊ नयेत, यासाठी खर्चाच्या हिशेबाची जुळवाजुळव सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.अमरावती महानगरपालिकेच्या ८७ जागांसाठी एकूण ६६१ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती, त्यापैकी ५७४ उमेदवारांचा पराभव झाला. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या तारखेपासून ते निकाल जाहीर होण्याच्या तारखेपर्यंतचा – दोन्ही दिवस धरून – संपूर्ण निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करणे बंधनकारक आहे. या कालावधीत उमेदवाराने केलेला थेट खर्च तसेच उमेदवाराच्या वतीने समर्थक, कार्यकर्ते किंवा पक्षाकडून करण्यात आलेला खर्चही उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करावा लागणार आहे.निवडणूक खर्चाबाबत उमेदवाराला कोणत्या बाबीवर किती खर्च करायचा यावर थेट बंधन नसले तरी, एकूण खर्चाची कमाल मर्यादा ओलांडता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ही कमाल मर्यादा राखीव व अराखीव उमेदवारांसाठी समान आहे. विशेष म्हणजे, उमेदवाराच्या प्रचारासाठी पक्षाने केलेला खर्चही उमेदवाराच्या खर्च मर्यादेत समाविष्ट करणे बंधनकारक असल्याने अनेक उमेदवारांना आपल्या खर्चाचा अचूक ताळमेळ बसवावा लागत आहे.खर्चात तफावत आढळल्यास नोटीसनिवडणूक शाखेकडून उमेदवारांनी सादर केलेल्या खर्च विवरणपत्रातील दरांची तुलना निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दरसूचीशी करण्यात येते. उमेदवाराने दाखविलेला खर्च ठरावीक दरांपेक्षा कमी असल्यास, संबंधित उमेदवाराला तफावतीबाबत नोटीस पाठवून खुलासा करण्याची संधी दिली जाते. समाधानकारक खुलासा न झाल्यास पुढील कारवाई केली जाऊ शकते.या पार्श्वभूमीवर उमेदवारांकडून सर्व देयकांची पावती, बिले, जाहिरातींचे खर्च, वाहन वापर, सभांचे आयोजन, बॅनर–पोस्टर, सोशल मीडिया प्रचार आदींचे तपशील संकलित करून विहित नमुन्यात खर्चाचा हिशेब सादर करण्यासाठी धावपळ सुरू आहे. विशेषतः पराभूत उमेदवारांमध्ये ही धांदल अधिक दिसून येत असून, भविष्यातील निवडणुकीत अपात्रतेसारखी कारवाई टाळण्यासाठी सर्व नियमांचे पालन करण्यावर त्यांचा भर आहे.निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करणे ही केवळ औपचारिकता नसून, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता राखण्यासाठी महत्त्वाची बाब असल्याचे निवडणूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी वेळेत व अचूक माहिती सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चार वर्षांनंतर महापौर बंगल्यात येणार पुन्हा चैतन्य


## नवीन महापौराच्या प्रतीक्षेत बंगला




विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

अमरावती महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून आता शहराचे लक्ष महापौरपदाकडे लागले आहे. येत्या २२ तारखेला महापौर आरक्षणाची सोडत निघणार असून त्यानंतर अवघ्या आठवडाभरात अमरावतीला नवीन महापौर मिळणार आहे. विशेष म्हणजे तब्बल चार वर्षांनंतर अमरावतीचा महापौर पुन्हा महापौर बंगल्यात विराजमान होणार असल्याने या बंगल्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.अमरावती शहरातील विद्यापीठ रोडवर असलेला महापौर बंगला गेल्या चार वर्षांपासून अक्षरशः ओस पडलेला आहे. मागील काळात महापौर नसल्याने किंवा प्रशासकीय परिस्थितीमुळे या बंगल्याचा वापरच झाला नाही. परिणामी, महापौर बंगला सध्या भकास अवस्थेत दिसून येत आहे. इमारतीची रंगरंगोटी उखडलेली असून अनेक ठिकाणी दुरवस्था स्पष्टपणे जाणवते. चार वर्षांच्या कालावधीत बंगल्याच्या देखभाल–दुरुस्तीवर कोणतेही लक्ष देण्यात आले नसल्याचे चित्र आहे.महापौर बंगल्याच्या परिसरातील बागेचीही दयनीय अवस्था झाली आहे. नियमित पाणीपुरवठा नसल्यामुळे येथील झाडे व रोपे सुकून गेली आहेत. एकेकाळी हिरवाईने नटलेला हा परिसर आता कोरडा आणि उजाड दिसत आहे. नागरिकांमध्येही याबाबत नाराजी व्यक्त केली जात असून, शहराच्या प्रथम नागरिकाच्या निवासस्थानाची अशी अवस्था होणे दुर्दैवी असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.मात्र, नवीन महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर आता प्रशासन हालचालींना वेग आला आहे. येत्या एक–दोन दिवसांत महापौर बंगल्याची दुरुस्ती, साफसफाई आणि रंगरंगोटीचे काम सुरू होण्याची शक्यता आहे. नवीन महापौरासाठी बंगला सज्ज करण्यासाठी आवश्यक ती कामे हाती घेतली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. बंगल्याच्या अंतर्गत व बाह्य स्वरूपात बदल करून तो नव्या रूपात सजवला जाणार आहे.२२ तारखेला आरक्षणाची सोडत निघाल्यानंतर महापौर कोणत्या प्रवर्गातून होणार हे स्पष्ट होईल. त्यानंतर सत्तास्थापनेच्या घडामोडींना वेग येणार असून महापौर निवडीवर शिक्कामोर्तब होईल. त्यानंतर अमरावतीचा नवीन महापौर अधिकृतपणे महापौर बंगल्यात प्रवेश करेल.चार वर्षांपासून ओस पडलेल्या महापौर बंगल्यात पुन्हा वर्दळ वाढणार, प्रशासकीय हालचाली सुरू होणार आणि शहराच्या प्रथम नागरिकाचे वास्तव्य होणार असल्याने महापौर बंगला पुन्हा चैतन्याने भरून निघेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# महापालिकेत २९ हिंदीभाषिक उमेदवारांचा विजय



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

महापालिका निवडणुकीत एकूण २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडून आले असून त्यापैकी २९ हिंदीभाषी उमेदवार विजयी झाले आहेत. या हिंदीभाषी नगरसेवकांमध्ये मुस्लिम समाजातील सर्वाधिक १८, सिंधी समाजातील ५ आणि राजस्थानी समाजातील १ नगरसेवकाचा समावेश आहे.

विजयी हिंदीभाषी नगरसेवकांमध्ये बबलू शेखावत, रतन डेंडुले, शेख जफर, इस्माईल लालूवाले, ललिता सुरेश रतावा, पूजा अग्रवाल, दीपक साहू, मनीष बजाज, स्नेहा लुल्ला, श्रीचंद तेजवानी, महेश मूलचंदानी, गौरी मेघवानी, अजय जयस्वाल, लुबना तनवीर, इकबाल साहिल, राशीद अली, खान आसिया अंजुम वहीद, मीर अहमद अली, कुबरा बानो, सलाउद्दीन, शाह अफसरजहाँ, शाह बीबी बतुल ताहेर, मरियम बानो, मोह. रेहान, शेख हमीद, नुजहत परवीन, नजीब खान यांचा समावेश आहे.

दरम्यान, महिला नगरसेवकांच्याविजयात भाजप आघाडीवर राहिली आहे. भाजपकडून १७ 'लाडक्या बहिणी' विजयी झाल्या असून महिलांच्या विजयाच्या बाबतीत भाजपने आघाडी घेतली आहे. भाजपनंतर काँग्रेसच्या ८ महिला, युवा स्वाभिमानच्या ७, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या ३ महिला विजयी झाल्या आहेत. याशिवाय बसपा, शिंदे गटाची शिवसेना आणि उबाठा शिवसेना यांच्याकडून प्रत्येकी १ महिला नगरसेवक विजयी झाली आहे.

# रस्ते अपघातातील जखमींसाठी केंद्र सरकारचे मोठे पाऊल सात दिवसांपर्यंत दोन लाखांपर्यंत मिळणार कॅशलेस उपचार

अरुण जोशी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

रस्ते अपघातातील जखमींचे प्राण वाचवण्यासाठी केंद्र सरकारने अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि मानवतावादी पाऊल उचलले आहे. रस्ते अपघातात जखमी झालेल्या नागरिकांना आता कॅशलेस वैद्यकीय उपचार योजनेअंतर्गत सात दिवसांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आर्थिक अडचणीमुळे किंवा रुग्णालयातील प्रक्रियांमुळे उपचारात होणारा विलंब टाळणे, हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे.विशेष म्हणजे, अपघातग्रस्त जखमी व्यक्तीला तातडीने रुग्णालयात पोहोचवून त्याचे प्राण वाचविणाऱ्या मदतनीसाला, म्हणजेच 'राहबीर'ला केंद्र सरकारकडून २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ही योजना लवकरच राष्ट्रीय स्तरावर लागू केली जाईल, अशी घोषणा केली आहे.प्रायोगिक योजना ठरली यशस्वीही कॅशलेस उपचार योजना प्रायोगिक तत्त्वावर काही भागांत राबविण्यात आली होती. या कालावधीत जखमींना तातडीने उपचार मिळाल्याने अनेकांचे प्राण वाचले. त्यामुळे ही योजना प्रभावी ठरल्याचे स्पष्ट झाले असून आता तिचा विस्तार देशभर करण्यात येणार आहे. रस्ते अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' हा अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात उपचार मिळाल्यास जखमी वाचण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र, पैशांअभावी अनेक वेळा उपचार थांबतात किंवा उशिरा सुरू होतात. ही अडचण आता दूर होणार आहे.मोटार वाहन कायद्यात ६१ महत्त्वाच्या दुरुस्त्यारस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात तब्बल ६१ महत्त्वाच्या दुरुस्त्या केल्या आहेत. यामध्ये दंडात्मक तरतुदी अधिक कठोर करण्यात आल्या असून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. रस्ते अपघात कमी करणे आणि अपघातानंतर जीवितहानी टाळणे, हे या सुधारणांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

हिट अँड रन प्रकरणात वाढीव नुकसानभरपाईधडक देऊन वाहन पळून जाण्याच्या (हिट अँड रन) प्रकरणांत मृत्यू झाल्यास मृतांच्या वारसांना देण्यात येणारी नुकसानभरपाई २ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे, तर गंभीर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. यामुळे अपघातग्रस्त कुटुंबांना तातडीचा आधार मिळणार आहे.

अपघातातील मृत्यू ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्टभारतात दरवर्षी रस्ते अपघातांमध्ये होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी सरकार केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता, तातडीच्या वैद्यकीय मदतीवर लक्ष केंद्रित करत आहे. आगामी काळात रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने निश्चित केले आहे.

नागरिक मदतीसाठी पुढे येणारअपघात पाहिल्यानंतर अनेक नागरिक कायदेशीर अडचणींच्या भीतीने मदतीसाठी पुढे येत नाहीत. ही भीती दूर करण्यासाठी 'गुड समरिटन (राहबीर) धोरण' अधिक प्रभावी करण्यात आले आहे. मदत करणाऱ्या व्यक्तीस बक्षीस आणि कायदेशीर संरक्षण दिल्याने नागरिक मदतीसाठी पुढे येतील, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. या निर्णयामुळे रस्ते अपघातातील जखमींचे प्राण वाचविण्यास मोठी मदत होणार आहे.

# ३,७४२ मतांचा करिष्मा कायम! महेंद्र कॉलनीत उमेदवार बदलले, पण भाजपची मतसंख्या अढळ

विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती

अमरावती शहराच्या महानगरपालिका निवडणुकीनंतर राजकारणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असतानाच, महेंद्र कॉलनी नवीन कॉटन मार्केट प्रभागातील एक अविश्वसनीय आणि राजकीय अर्थाने धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रभागात मतदार बदलले नाहीत, मतदानाचा आकडा बदलला नाही, विजयी मतसंख्याही बदलली नाही, बदलला फक्त उमेदवार ! प्रभाग क्रमांक ५ महेंद्र कॉलनी नवीन कॉटन मार्केट येथे २०१७ च्या निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर संजय वानरे विजयी झाले होते. त्या वेळी त्यांना ३,७४२ मते मिळाली होती. यंदाच्या निवडणुकीत भाजपने त्यांची उमेदवारी पक्की म्हणून प्रभागात ॲक्टीव राहण्यासाठी सांगितले, दूसरीकडे मात्र दबाव तंत्र वापरत निकटवर्तीय मानले जाणाऱ्यांना उमेदवारी दिली. परिणामी तिकीट नाकारल्याने संजय वानरे यांनी शिवसेना शिंदे गटाकडून निवडणूक लढवली; मात्र यावेळी त्यांना मतदारांचा पाठिंबा मिळू शकला नाही.

दरम्यान, भाजपकडून यंदा मैदानात उतरलेल्या सुनीता लोणारे यांनी ही निवडणूक जिंकली. विशेष म्हणजे, सुनीता लोणारे यांनाही अगदी ३,७४२ मतेच मिळाली, जी २०१७ मध्ये संजय वानरे यांना मिळालेल्या मतांइतकीच आहेत! एकही मत कमी जास्त झालेले नाही.

एकाच प्रभागात, दोन वेगवेगळ्या निवडणुका दोन वेगवेगळे उमेदवार, मात्र विजयी मतसंख्या समसमान हा निव्वळ योगायोग की 'उमेदवार नव्हे, पक्षच महत्त्वाचा' हे मतदारांनी पुन्हा एकदा ठणकावून सांगितले आहे?या निकालामुळे शहराच्या राजकारणात ब्रँड भाजपा विरुद्ध चेहरा ही चर्चा पुन्हा ऐरणीवर आली आहे. तिकीट नाकारताच उमेदवाराची मते घसरतात आणि तिकीट मिळताच नवा चेहरा त्याच मतसंख्येवर विजयी ठरतो. यावरून संघटनात्मक ताकद, बूथ मॅनेजमेंट आणि पक्षनिष्ठ मतदारांची भूमिका निर्णायक ठरते असल्याचे स्पष्ट होत आहे. महेंद्र कॉलनीतील हा निकाल आता केवळ आकड्यांचा खेळ राहिलेला नसून, भविष्यातील महापालिका राजकारणाची दिशा ठरवणारा संकेत मानला जात आहे. मतदार उमेदवार पाहतो की पक्ष ? या प्रश्नाचे उत्तर या प्रभागाने आकड्यांतूनच दिले आहे.

# बडनेरात भाजपची नामुष्की

## कोअर कमिटीतील दोन दिग्गज पडले,८ पैकी एकही जागा नाही

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती


अमरावती महानगरपालिकेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निवडणूक निकालांमध्ये सर्वाधिक चर्चेचा आणि धक्कादायक निकाल बडनेरा शहरातून समोर आलेला आहे. बडनेराच्या दोन प्रभागांतील एकूण ८ जागांवर भाजपचा पूर्णपणे 'सुपडा साफ' झाला आहे.



प्रभाग क्रमांक २२ (नवी बस्ती, बडनेरा) येथे आमदार राणा यांच्या नेतृत्वाखालील युवा स्वाभिमान पार्टीने 'क्लीन स्वीप' करत चारही जागा जिंकल्या, तर प्रभाग क्रमांक २१ (जुनी बस्ती, बडनेरा) येथे एमआयएमने तीन जागांवर आणि युवा स्वाभिमान पार्टीने एका जागेवर विजय मिळवला. परिणामी भाजपला बडनेरा शहरातून अक्षरशः 'हद्दपार' व्हावे लागले आहे.या पराभवामुळे बडनेरा परिसराशी थेट संबंधित असलेले भाजपचे दोन नेते मनपा निवडणूक प्रमुख तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य जयंत डेहनकर व प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांना जबरदस्त झटका बसलेला आहे. विशेष म्हणजे हे दोघेही भाजपच्या शहरस्तरीय कोअर कमिटीतील प्रमुख चेहरे होते.जुनी वस्ती बडनेराचे रहिवासी असलेले प्रदेश, प्रवक्ते शिवराय कुलकर्णी तसेच नवी वस्ती बडनेराशी संबंधित असलेले माजी शहराध्यक्ष व मनपा निवडणूक प्रमुख जयंत डेहनकर यांच्याकडे उमेदवार निश्चितीपासून ते निवडणूक रणनीती आखण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी होती. पक्षाने शहरातील सर्व प्रमुख नेत्यांना स्वतंत्र प्रभागांची जबाबदारी दिली असताना, या दोघांनाही त्यांच्या स्वतःच्या गृहप्रभागांचीच जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात दोन्ही प्रभागांमध्ये भाजपसाठी निकाल 'टायं–टायं फिस्स' ठरला.बडनेरातील एकूण ८ पैकी एकाही जागेवर भाजपचा उमेदवार निवडून येऊ शकला नाही. एकेकाळी भाजपचा मजबूत गड मानला जाणारा नवी वस्ती बडनेरा याठिकाणी यावेळी युवा स्वाभिमान पार्टीने पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. तर जुनी वस्ती बडनेरा येथे आधीच मर्यादित असलेली भाजपची शक्यता आता एमआयएम आणि युवा स्वाभिमान पार्टीच्या वाढत्या प्रभावामुळे निकालाने पूर्णतः संपुष्टात आणलेली आहे.

# भाजपाच्या टोळीमुळे पराभव, त्यांनीच मेसेज फिरवले अन्, समाधान सरवणकरांचे गंभीर आरोप

विदर्भ प्रजासत्ताक दि. २० मुंबई



प्रभादेवी–वरळी या शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात ठाकरेंच्या शिवसेनेला चांगली मते मिळाली. येथील प्रभागांत ठाकरेंचे नगरसेवक जिंकून आले आहेत. मात्र, येथे शिंदेसेनेच्या विरोधात भाजपाच्या स्थानिक टोळीने कार्य केल्याने शिंदेसेनेला मोठा फटका बसला असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार सदा सरवणकर यांचे सुपूत्र आणि प्रभाग क्रमांक १९४ चे पराभूत उमेदवार समाधान सरवणकर यांनी केला आहे. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.

समाधान सरवणकर म्हणाले, माझा फक्त ५०० मतांनी पराभव झाला आहे. मला असं वाटतं माझ्या मतदारांनी चांगल्याप्रकारे साथ दिली. शिवसेना उबाठा आणि मनसेची युती असताना माझ्यामागे मोठं मताधिक्य उभं राहिलं. फक्त ५०० मतांनी माझा पराभव झाला. उद्धव साहेब प्रत्येक बुथवर फिरत होते. मतदानाच्या आधी दोन्ही युवराजांच्या सभा झाल्या. पाच–पाच आमदार माझ्या वॉर्डात फिरत होते. पॉवरफूल फोर्स असतानाही मतदार माझ्या मागे उभे राहिले.

**भाजपाच्या टोळी मेसेज फिरवले**

निवडणूक प्रचाराच्या वेळी भाजपाकडून मदत झाली का असा प्रश्न विचारला असता सरवणकर म्हणाले, सुरुवातीच्या टप्प्यात भाजपाकडून मदत झाली. पण नंतर झाली नाही. काही विशिष्ट पदाधिकाऱ्यांकडून मेसेज आला की यांना मदत करायची नाहीय. हे व्हॉट्सॲप मेसेज मी वाचले.


# संत गाडगे बाबा विद्यापीठातील प्रमाणपत्र सेवांचे शुल्क वाढ; प्रहार आक्रमक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती



आज प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत देण्यात येणारे प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. ती शुल्कात केली अवाढव्य वाढ विद्यार्थ्यांना न परवडणारीच आहे, विद्यार्थ्यांना परीक्षेत मिळालेल्या गुणांची पूर्णमोजणी शुल्क हे २० रूपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार १०० केले आहे, दुय्यम गुणपत्रिका किंवा तात्पुरती गुणपत्रिका शुल्क हे १०० रुपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार ५०० केले आहे, दुय्यम पदवी प्रमाणपत्र वाटप शुल्क ४०० रुपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार १००० केले आहे, अश्या ४२ प्रकारच्या अनेक प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने केली आहे..बहुसंख्य विद्यार्थी हे शेतकरी,मजुर,कामगार तसेच गरीब घरातील विद्यार्थी आहेत. त्यामुळे विद्यापीठाने केलेली शुल्क वाढ विद्यार्थ्यांना न परवडणारी आहे. तरी आपण त्वरित हा प्रमाणपत्रे व इतर सेवांचे शुल्क वाढीचा निर्णय त्वरित मागे घ्यावा, व विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. ही नम्र विनंती लवकरात लवकर ७ दिवसाच्या आत विद्यापीठाने प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात केलेल्या वाढीचा निर्णय मागे घेतला नाही तर प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने प्रहार स्टाईल तीव्र आंदोलन करण्यात येईल,असे निवेदन देण्यात आले, निवेदन देतेवेळी जिल्हाप्रमुख आकाश दादा खारोडे, समर्थ डवरे, ऋषिकेश ठवकर,विशाल आवारे ऋषी पोहोकर,आकाश टापरे, रोहित शहाणे,रुद्रेश सायंडे,प्रज्वल भोकसे, कुणाल नागे,निखिल ठाकरे, ऋषी धाबे, सार्थक याउल,भूषण डोंगरे,कार्तिक फिसके,आशिष बंड, अनुज घावडे अनेक पदाधिकारी व विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये 'टेकलॉन्स–२०२६' चे थाटात उद्घाटन




विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे आयोजित बहुचर्चित तांत्रिक महोत्सव टेकलॉन्स–२०२६ चे उद्घाटन मोठ्या उत्साहात व थाटात पार पडले. या महोत्सवाचे उद्घाटन श्री. स्वप्नील वानखडे (आयएएस अधिकारी) तसेच ग्रुप कॅप्टन ॲस्ट्रोनॉट अंगद प्रताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष माजी राज्यमंत्री श्री. प्रविण पोटे पाटील, डॉ. मिलिंद बाऱ्हाते (कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ), संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, गुगल बंगलोर येथे कार्यरत महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. वैभव आष्टीकर, श्री. नितीन कोळी (संचालक, परीक्षा विभाग – संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ), संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांच्यासह सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन व विभागप्रमुख उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना श्री. स्वप्नील वानखडे म्हणाले की, ज्याच्यामध्ये अपयश स्वीकारण्याची आणि त्याला सामोरे जाण्याची क्षमता असते, तो व्यक्ती जीवनात कधीच मागे राहत नाही. अपयशातूनच यशाचा मार्ग तयार होतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.ग्रुप कॅप्टन ॲस्ट्रोनॉट अंगद प्रताप यांनी विद्यार्थ्यांना यशाचा त्रिकोण या संकल्पनेबाबत मार्गदर्शन करत शिस्त, समर्पण आणि सातत्य या यशाच्या तीन प्रमुख आधारस्तंभांचे महत्त्व अधोरेखित केले. योग्य संतुलन ठेवल्यास कोणतेही ध्येय गाठता येते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.यावेळी डॉ. मिलिंद बाऱ्हाते यांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशिअल इंटेलिजन्स व त्याचे आधुनिक शिक्षण आणि करिअरमधील महत्त्व स्पष्ट केले. भविष्यातील तंत्रज्ञानात एआयची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्याचा सकारात्मक व योग्य वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.त्यानंतर महोत्सवांतर्गत विविध स्पर्धांना सुरुवात करण्यात आली. यामध्ये कोडेथॉन, डेटाथॉन, बिझनेस प्लॅन, टॅलेंट बॅटल, प्रोजेक्ट मॉडेल प्रदर्शन, अन्वेन्शन, स्ट्रक्टफास्ट, सर्किट मॅनिया, ॲग्रीकल्चर एक्सिबिशन, क्विवार, आयुर्वेद आयडियाथॉन व बेस्ट आउट ऑफ वेस्ट अशा स्पर्धांचा समावेश आहे.कार्यक्रमाच्या शेवटी हॅकथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या संदीप इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर, नाशिक यांना एक लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच विविध कॅटेगरीत पाच महाविद्यालयांना प्रत्येकी वीस हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. एनपीटीईएलमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत